बुधवार, १२ एप्रिल २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२१९
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●WEDNESDAY 12 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-219 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

# सचिन पायलट यांचे काँग्रेस पक्षाविरोधात बंड

## ११ एप्रिल रोजी सार्वजनिक सुटी जाहीर करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : काँग्रेसचे नेते, राज्याचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांनी आज स्वतःच्याच सरकारविरोधात एक दिवसाचे लाक्षणिक उपोषणाचे हत्यार उपसले. भाजपाच्या सत्ताकाळात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची मागणी त्यांनी आपल्या सरकारकडे लावून धरली होती. विशेष म्हणजे मंगळवारी महात्मा जोतिबा फुले यांची जयंती होती. त्या पार्श्वभूमीवर जोतिबा फुले यांच्या प्रतिमेला वंदन करून पायलट यांनी आपले आंदोलन सुरू केले. जोतिबा फुले यांच्यानिमित्ताने ओबीसी, दलित, वंचित समाजाला हाक देत, विधानसभा निवडणुकीआधी पायलट यांनी स्वतःचे नेतृत्व सिद्ध करण्याचा एक प्रयत्न केल्याचे यातून दिसत आहे.**

सचिन पायलट यांनी जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त ११ एप्रिल या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्याचीही मागणी स्वतःच्या सरकारपुढे केली आहे. १९ व्या शतकाच्या मध्यात महिलांसाठी शिक्षण, शोषण-जातिविरहित समाज निर्माण करण्यासाठी जोतिबा फुले यांनी संघर्ष केला होता. या संघर्षाची आठवण म्हणून ही सुट्टी जाहीर करावी, अशी त्यांची मागणी आहे.

फक्त सचिन पायलटच नाही, तर पंतप्रधान मोदींपासून ते विविध नेत्यांनी जोतिबा फुले यांना अभिवादन केले आहे. मोदींनी अभिवादनपर केलेल्या ट्विटमध्ये लिहिले की, मी महात्मा फुले यांना अभिवादन करतो आणि सामाजिक न्याय क्षेत्रात त्यांनी दिलेल्या महान योगदानाचे स्मरण करतो. त्यांचे विचार लाखो लोकांना प्रेरणा आणि शक्ती देतात. या ट्विटसोबत त्यांनी फुलेंविषयी काढलेल्या गौरवोद्गाराचे एक भाषणही जोडलेले आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनीदेखील फुले यांच्या कार्याचा गौरव केला आहे. त्यांनी लिहिले की, समाजात न्याय आणि समतेचे राज्य निर्माण करण्यासाठी फुले आम्हाला प्रेरणा देतात.

राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनीदेखील महात्मा फुले यांना आदरांजली वाहिली. सुधारणावादी चळवळीचे प्रणेते आणि वाईट चालीरीती, प्रथा-परंपरा यांना छेद देऊन सामाजिक समता आणि न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या महात्मा जोतिबा फुलेंना विनम्र अभिवादन. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख, खा. शरद पवार यांनी महात्मा जोतिबा फुले यांना अभिवादन करताना म्हटले की, महात्मा जोतिबा फुले यांनी शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली. स्त्रियांना शिक्षणाची वाट दाखवणारे, समाजाला परिवर्तनाची दिशा देणारे ज्येष्ठ समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!




केंद्रीय महिला व बाल विकासमंत्री स्मृती इराणी यांनीही महात्मा फुले यांना जयंतीनिमित्त नमन केले. त्यांनी आपल्या ट्विटमध्ये लिहिले की, १९ व्या शतकात महिलांना शिक्षण आणि समान हक्क मिळवून देण्यासाठी महात्मा जोतिबा फुले यांनी अतुलनीय योगदान दिले.

## सर्वोच्च न्यायालयाकडून 'अग्निपथ'वर शिक्कामोर्तब

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** अग्निपथ योजनेसंबंधी दिल्ली उच्च न्यायालयाच्या निकालाला आव्हान देणाऱ्या दोन याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळल्या. दिल्ली उच्च न्यायालयाने यापूर्वी एका निकालामध्ये केंद्र सरकारची अग्निपथ योजना उचलून धरली आहे. ज्या उमेदवारांची अग्निपथ योजना सुरू होण्यापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यांसारख्या भरती अभियानांमध्ये निवड झाली असली तरी त्यांना नियुक्तीचा कोणताही विहित हक्क मिळालेला नाही असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

यासंदर्भात गोपाल कृष्णन आणि अॅड. एम एल शर्मा यांनी स्वतंत्र याचिका दाखल केल्या होत्या. मात्र, आम्हाला दिल्ली उच्च न्यायालयाच्या निकालामध्ये हस्तक्षेप करण्याची इच्छा नाही, उच्च न्यायालयाने सर्व बाजू विचारात घेतल्या आहेत असे न्यायालयाने स्पष्ट केले. त्याच वेळी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि न्या. पीएस नरसिंह आणि न्या. जे बी पारदीवाला यांच्या खंडपीठाने यासंदर्भात तिसरी याचिका दाखल करून घेतली. अग्निपथ योजनेपूर्वी भारतीय हवाई दलामध्ये ( आयएएफ ) भरतीशी संबंधित ही याचिका आहे. त्यावर १७ एप्रिलला सुनावणी होणार आहे. न्यायालयाने केंद्र सरकारला या याचिकेसंदर्भात उत्तर द्यायला सांगितले आहे. आयएएफमध्ये नोकरीसाठी प्रयत्नशील तरुणांच्या वतीने ही याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांचा समावेश तात्पुरत्या निवड यादीत करण्यात आला आहे, त्यांनी लेखी परीक्षा उत्तीर्ण केली आहे, तसेच त्यांच्या शारीरिक आणि वैद्यकीय चाचण्या झाल्या आहेत असे त्यांचे वकील अॅड. प्रशांत भूषण यांनी न्यायालयाला सांगितले. कोविड-१९ साथीमुळे त्यांची नियुक्तीपत्रे रखडली पण ती दिली जातील असे सरकार त्यांना सांगत राहिले. याचिकाकर्ते आयएएफच्या नियुक्ती पत्रांची वाट पाहत असल्यामुळे ते निमलष्करी दलांमध्ये नोकरीसाठी रुजू झाले नाहीत. हे उमेदवार तीन वर्षांपासून नियुक्तीपत्रांच्या प्रतीक्षेत आहेत असे भूषण यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

# भाजपची उमेदवारी यादी पुन्हा लांबणीवर

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** कर्नाटकमधील भाजपच्या उमेदवारांच्या निवडीसाठी दिल्लीत सलग चार दिवस बैठकांचे सत्र सुरू असून सोमवारीदेखील अनिश्चितता कायम होती. उमेदवारांची पहिली यादी सोमवारी जाहीर होणे अपेक्षित होते, मात्र त्यासाठी आता मंगळवार किंवा बुधवार उजाडेल, असे कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत केंद्रीय निवड समितीच्या तीन तासांच्या बैठकीत सर्व उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब न झाल्याने सोमवारी सकाळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या निवासस्थानी वरिष्ठ नेत्यांची चर्चा झाली. शहा अरुणाचल प्रदेशच्या दौऱ्यावर निघून गेल्यानंतर पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या निवासस्थानी चर्चेची दुसरी फेरी झाली. तरीही संभाव्य उमेदवारांबाबत नेत्यांच्या मनात किंतू राहिल्याने पुन्हा चर्चा होऊन कदाचित मंगळवारी उमेदवारांची पहिली यादी जाहीर होऊ शकेल. 'काही उमेदवारांबाबत मतदारसंघातून अधिक माहिती मागितली असून त्या आधारावर त्यांचे पुन्हा मूल्यमापन केले जाईल आणि नव्या उमेदवारांवर चर्चा करावी लागेल,' असे बोम्मई यांनी पत्रकारांना सांगितले.प्रत्येक मतदारसंघात तीन उमेदवारांच्या पर्यायांची यादी प्रदेश भाजपच्या नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वाकडे दिली होती. त्यावर पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीआधी सलग दोन दिवस पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या निवासस्थानी झालेल्या चर्चामध्ये बराच खल झालेला होता. त्यानंतर मोदींसमोर उमेदवार निश्चितीसाठी फायदा-तोटयाचे गणित मांडले गेले. या बैठकांमध्ये बोम्मई, येडियुरप्पा, अमित शहा, जे. पी. नड्डा, निवडणूक प्रभारी धर्मेंद्र प्रधान, सहप्रभारी मनसुख मांडाविया, प्रभारी अरुण सिंह, बी. एल. संतोष, सी. टी. रवी, प्रल्हाद जोशी, प्रदेशाध्यक्ष नलीनकुमार कातील तसेच अन्य प्रदेश भाजपचे नेते उपस्थित होते.

**बोम्मई पारंपरिक शिगावमधून :** कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई हे



पारंपरिक शिगाव मतदारसंघातून निवडणूक लढणार आहेत . २००८ पासून तीनवेळा या मतदारसंघातून बोम्मई विधानसभेचे सदस्य बनले आहेत . माजी मुख्यमंत्री बी . एस . येडियुरप्पा यांची मागणीही मान्य झाल्याचे सांगितले जाते . येडियुरप्पा यांचे पुत्र विजयेंद्र यांना शिकारीपुरा मतदारसंघातून उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे . काँग्रेसचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार सिद्धरामय्या यांच्या विरोधात वरुणा मतदारसंघातून विजयेंद्र यांना उमेदवारी देण्याचा विचार केंद्रीय नेतृत्वाने केला होता . मात्र, येडियुरप्पा यांनी हा विचार हाणून पाडला असून आपल्या बालेकिल्ल्यातून विजयेंद्र यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यावर येडियुरप्पा ठाम राहिल्याचे दिसते .


## राज्यातील तीन मोठे प्रकल्प लागणार मार्गी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या विरार – अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेसह जालना – नांदेड समृद्धी मार्ग ( विस्तारीत मार्ग ) आणि पुणे वर्तुळाकार रस्ता प्रकल्प लवकरच मार्गी लागण्याची चिन्हे आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या तिन्ही महत्त्वाकांक्षी आणि मोठ्या प्रकल्पांच्या बांधकामासाठी मंगळवारी स्वारस्य निविदा जारी केल्या आहेत. तिन्ही प्रकल्पांची कामे टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून समृद्धी महामार्गाप्रमाणे प्रत्येक टप्प्यासाठी स्वतंत्र कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यातील ९६.४१ किमी लांबीच्या मार्गिकेचे बांधकाम ११ टप्प्यात करण्यात येणार आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# अजिंठ्याच्या लेण्यांतून घडणारे बुद्ध दर्शन



आधुनिक केसरी

बोधिसत्व म्हणजे बुद्ध होण्याचे सत्व किंवा क्षमता ज्यामध्ये आहे अशी व्यक्ती. बोधिसत्वांनी आपल्या आधीच्या जन्मांमध्ये दान, प्रज्ञा, शील, धैर्य, करुणा यासारख्या दहा गुणांमध्ये पारमिता म्हणजे परिपूर्णता प्राप्त केली. त्याचा फायदा त्यांना पुढील जन्मात झाला. बुद्ध जन्मामध्ये सुरुवातीला अंगात मर्दुमकी नसलेला, युद्धाची इच्छा नसलेला तरुण गौतम हा सर्वांच्याच चिंतेचा विषय होता. आईचे सौख्य तर त्याला लाभलेच नाही. त्याचे वडील असलेल्या शुद्धोधन राजाला आपल्या या जगावेगळ्या असलेल्या मुलाच्या भविष्याची चिंता पोखरत होती. लहानपणापासूनच काहीशा विरक्त असलेल्या या गौतमाच्या अंगात मात्र अनेक मानवी सद्‍गुणांचा वास होता. दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होणे, दुसऱ्यांच्या आनंदाने आनंदी होणे, समोरची व्यक्तीच काय परंतु प्राण्यांच्या देखील भावना आणि वेदना समजून घेणे, त्यांना आपल्या परीने साहाय्य करणे या गुणांनी त्याचे व्यक्तिमत्व मंडित झाले होते. त्याच्या अंगात शौर्य, मर्दुमकी यांचा अभाव होता असे नाही पण त्या गुणांचे प्रदर्शन करण्याची कधी त्याला इच्छा झाली नाही. प्राणिमात्रांबद्दल प्रेम आणि त्यांच्या वेदना समजून घेण्याची उपजत प्रवृत्ती अंगात असल्याने त्याने इतर राजे किंवा राजपुत्रांसारखी शिकार वा मृगया करण्यात धन्यता मानली नाही. यशोधरेशी विवाह होण्याच्या पूर्वी झालेल्या स्वयंवरात मात्र आपल्या अंगातील शौर्य, युद्धकला आदींचे दर्शन त्याने उपस्थितांना घडवले होते. तेही केवळ आपल्या वडिलांच्या समाधानासाठी. वडिलांच्या इच्छेनुसार विवाह तर पार पडला, पण हा राजबिंडा तरुण संसार सुखात रमणारा नव्हताच. सगळी सुखे हात जोडून उभी होती. सुंदर आणि भव्य असा राजप्रासाद, अत्यंत सुस्वरूप आणि सुस्वभावी अशी पत्नी, आज्ञाधारक नोकरचाकर हे सगळे असूनही मनाला एक वेगळी ओढ लागली होती. ही ओढ होती मानवजातीला सौख्य प्रदान करण्याची, दुःखमुक्त करण्याची. गौतमाला जी विरक्ती आली होती, ती आतून आलेली होती. त्याच्या पूर्वजन्मीच्या तपस्येचे ते फलित होते.



## आनंदी पहाट

# जीवनातील गोडी कशात आहे, हे समजून घ्यावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपण अनेकदा घडून गेलेल्या घडामोडी आणि घटना ह्यांच्यातच गुरफटलेले असतो. त्या लवकर विसरत नाहीत. त्यांतही नकारात्मक गोष्टी आपल्याला अधिकच सतावत राहतात, दुःखी करतात. आपल्या विचारांत सकारात्मकता आणल्याने येणारा अनुभव आणि त्याद्वारे मिळणारा आनंद निश्चितच आंतरिक समाधान आणि मानसिक शांती देणारा असतो. प्रत्येक बाबीकडे खिलाडू वृत्तीने बघितले, आनंदाने प्राप्त परिस्थितीचा स्वीकार केला तर आपल्या जीवनशैलीत नक्कीच बदल घडून येऊ शकतात. चांगली भूमिका, चांगली ध्येय आणि चांगले विचार असणारे लोक नेहमी आठवणीत राहतात - मनातही, शब्दातही आणि आयुष्यातही. ह्या सकारात्मक विचारांचा उपयोग आपल्याला होत राहतो. जेवणातल्या मीठाप्रमाणे जीवनात चव आणणाऱ्यांपैकी आणि जीवनाची गोडी वाढवणाऱ्यापैकी आपण एक असावे आणि आपल्या जीवनाला सार्थकता प्राप्त करून घ्यावी, असा सकारात्मक विचार प्रत्येकाने करायला सुरुवात केली तर एकूणच वातावरणात सकारात्मकता, जाज्वल्य, आश्वासकता निर्माण

झाल्याची प्रचीती येऊ लागते. आपले म्हणून ज्यावेळी आपण एखाद्या व्यक्तीचा अथवा गोष्टीचा मनापासून स्वीकार करतो तेव्हाच त्यांमधील आपला सहभाग वाढत जातो. तुझे-माझे करण्याच्या विचारांमुळे असणारा सहभाग केवळ माझ्या स्वतःशी संबंधित गोष्टींशीच राहतो. आपण सहजीवनाचा एकदा स्वीकार केला तरीही, आपल्या विचारांत आणि आचारांत फारसा बदल होतोच असे नाही. दोन किंवा त्यांपेक्षा अधिक व्यक्तींमध्ये मतभिन्नता असणे स्वाभाविक आणि नैसर्गिक असते. पण मतभेद होत राहणे हे सकारात्मक सहजीवनास बाधक आणि घातक ठरू शकतात, ह्याचे भान राहणे आवश्यक असते. अनेकदा घडणाऱ्या काही घटना, घडामोडी ह्या निसर्गनियमांमुळे सुरु असल्यासारखे वाटते. कदाचित सहभागाचा अभाव असल्याचे ते महत्वाचे कारण असावे. सहभागाचा आनंद हा केवळ त्याची प्रचीती आल्याशिवाय मिळत असतो.



आधुनिक केसरी

**श्वासाचा सत्संग | एक झाला ||**

सज्जन संगती | जाण तोचि स्वर्ग ||
जोडावा सन्मार्ग | संतकृपे ||
कुटाळकी निंदा | घातकी जीवना ||
तयापरि मना | मौन बरे ||२||
नश्वराचा संग | करावा थोडका ||
ईश्वरची सखा | जन्मभर ||३||
तुझे-माझे आता | नको व्यवहारी ||
नामाच्या गजरी | एक होऊ ||४||
सावळ्याची वारी | सावळ्याचा संग ||
श्वासाचा सत्संग | एक झाला ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

**विशुद्धं मानसं मेऽस्तु**
**संलग्नं तव पादयोः |**
**साम्राज्यं मेऽस्तु मातः**
**सकलहितहेतवे || ४ ||**
**माझे मन विशुद्ध आणि तुझ्या पायी संलग्न असावे. सर्वांच्या हितासाठी माझे साम्राज्य असावे.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**दीन अधीन गरीब है, अहं वीपदा नाश ।**
**पटके मटुकी मान की, ता घट गुरु कर वास**
**।।२१।।(स्वर्वेद तृतीय मण्डल दशम अध्याय)**
**०३/१०/२१ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

दीन-अधीन गरीब होऊन सद्‍गुरूंना शरण गेल्यास अहंकार आणि विपदांचा नाश होतो. अहंकारामुळेच सर्व संकटांनी ग्रासून जीवाचे अधःपतन होते. त्यामुळेच अहंकाराने निर्माण झालेले मानाचे मडके डोक्यावरून उतरवून खाली फेकून दिल्याने त्या ठिकाणी सद्‍गुरूंचा निवास होतो. अभिमानी मध्ये सद्‍गुरूंचे ज्ञान प्रगट होऊ शकत नाही. शुध्द हृदयातच सत्य ज्ञानाचा प्रसार होऊन शांती आणि विज्ञानाची प्राप्ती होते.ल्यावरही आपल्या सद्‍गुरु मार्ग आणि सिध्दांतापासून किंचितही विचलीत होत नाहीत.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्‍गुरू
सदाफल देवजी
महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी

विनोदनिर्मिती किंवा विनोदबूध्दी असणं निर्मळ मनाचं लक्षणंअसतं. घमेंडी,स्वार्थी माणसाला नाना व्यसने आवडतात. तर तामसी माणसाला दुष्कर्म करायला आवडते. मूर्ख माणसाला वाईट नाद असतो. निंदकाला समोरच्या चं चांगलं बघवत नाही. तर पापी माणूस आपली पापबुध्दी समोरच्यावर लादतो. त्याच्या मनात चांगली बुद्धी कधी निर्माण होतचं नाही. कुणाला रसाळपणा आवडतो. तर कुणाला पाल्हाळपणा आवडतो. तर सात्विक सज्जन,भोळ्याभाबड्या स्वभावाच्या माणसाला आपली भोळी भाबडी भक्तिचं खरी वाटते. तो शेवटपर्यंत भक्तित जीवन व्यतीत करतो. शुर माणसाला लढाई आवडते. कुणाला अनेक धर्माचा अभ्यास करायला आवडतो. कुणी सुंदर निसर्ग चित्र रंगवतो तर कुणी सदाचाराची पेरणीं समाजमानावर करून सभ्य ,सुसंस्कृत समाज निर्माण करण्यासाठी झटतो. शिक्षण, रोजगार आरोग्य, शेती, वैज्ञानिक दृष्टिकोन ठेऊन केलेले नवनवीन प्रयोग, अंराळ संशोधन,पायाभूत सुविधा, बालकांचे आणि प्रौढांचे प्रश्न अशा वेगवेगळ्या प्रकारच्या म्हणजेच मानवी जीवनातील आवश्यक गोष्टींचा अभ्यास करून माणुसधर्म निभावला पाहिजे. हे सर्व परमार्थाची जाणीव अंगात असेल तरचं शक्य होईल.त्यासाठी भक्तिमार्गाची पुस्तके वाचावीत. काही लोकांना उगाचचं विनाकारण खुसपट काढून भांडण,वादावादी करायच सवय असते अशी माणसं खरी नव्हेत.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# सत्संगतीचे दोन प्रकार

आधुनिक केसरी

सत्संगती अती अपूर्व काम करणारी आहे. संतांची संगत दोन प्रकारे होऊ शकते. एक, संतांच्या देहाची; दुसरी, संतांनी सांगितलेले साधन करीत राहण्याची. यांपैकी पहिली, म्हणजे संताच्या देहाची संगती लाभणे फार कठीण आणि दुर्मिळ. कारण संत जरी खरा असला तरी त्याला ओळखणे कठीण असते, आणि पुष्कळदा त्याच्या बाह्य वागणुकीवरून मनात विकल्प येण्याचा संभव असतो; आणि एखाद्या भोंदूशीच गाठ पडली तर त्याच्या संगतीपासून नुकसान हे ठरलेलेच. म्हणून पहिला, म्हणजे संताच्या देहाच्या संगतीचा मार्ग, हा पुष्कळदा धोक्याचा ठरण्याचा संभव असतो. दुसऱ्या मार्गाने जाण्यात, म्हणजे त्याने सांगितलेले साधन करण्यात, बिलकूल धोका नसतो; कारण खरा संत काय किंवा भोंदू साधू काय, कोणीही झाला तरी तो दुसऱ्याला सांगताना खरे आणि बरोबर असेल तेच सांगेल. तो भोंदू असला तरी, आपला भोंदूपणा लपविण्याकरिता, जे बरोबर असेल तेच सांगणे त्याला जरूर असते. साधकाने शुद्ध भावनेने ते साधन केले की सत्संगतीचा



फायदा मिळून त्याचे काम होते. खऱ्या संताच्या देहाच्या संगतीचा लाभ जर दैववशात् प्राप्त झाला तर मात्र काम बेमालूम होते. ज्या वाहनाचा आपण आश्रय करतो त्या वाहनाचा वेग हा आपला वेग होतो; फक्त त्या वाहनात निश्चल बसून राहणे एवढेच आपले काम असते. तसे आपण खऱ्या संताजवळ नुसते पडून राहावे. संताच्या संगतीत आपली कृती अशी काहीच नसते, नुसते अस्तित्व असते. त्यामुळे अहंकाराला वाव न राहून वासनेचा क्षय व्हायला फार मदत होते. तुकाराम महाराजांनी देवाजवळ धनसंपदा मागितली नाही, मुक्तीदेखील नको असे म्हटले, फक्त संतसंगती दे असे म्हटले.

संतसंगाने नाम घेण्याची बुद्धी येते. बुद्धीची स्थिरता ठेवणे हे फक्त नामानेच साधेल. नाम जरूर तेवढे ठेवते आणि बाकीचे नष्ट करून टाकते. पण अनन्यभावाने नाम घ्यावे. नाम घेता घेता बुद्धीला स्थिरता येते; आणि मग मनात विकल्प न येता संतांच्या देहाच्या संगतीचा खरा फायदा घेता येतो. सत्संगतीत कष्टाशिवाय ईश्वरप्राप्ती होते. संतसंगतीत साधने आपोआप होत असतात. त्यांच्या पूजनाबरोबर पूजन, भजनाबरोबर भजन, श्रवणाबरोबर श्रवण, स्मरणाबरोबर स्मरण आपोआप होते. सत्संगतीत स्वतःची विस्मृती होते आणि नामस्मरण घडते. म्हणून प्रयत्नाने संतसंगती करावी. तिथे प्रारब्ध आणू नये. सत्संगतीत राहून नाम घेतले तर देहबुद्धीच्या कोंडीतून बाहेर पडता येते.

**आजचे बोधवचन आहे –**
**संतांना जे आवडते ते आपल्याला आवडणे म्हणजे त्यांचा समागम करणे होय. श्रीराम समर्थ**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**कुंथाच्या ढेकरें न देवेल पुष्टी । रूप दावी कष्टी मळिण वरी ॥२॥**
**तुका म्हणे अरे वाचाळ हो ऐका । अनुभवेंविण नका वाव घेऊं ॥३॥**
**जेणें घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावीं तीं ॥१॥**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, १२ एप्रिल २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari


# आमचे मरण हेच तुमचे धोरण..!

## तुमचं चाललंय राजकारण अन् आमचं होतय मरण!!... मदतीच्या प्रतीक्षेत बळीराजाच्या नजरा..!

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** तालुक्यासह राज्यात गारपीट वादळ परतीच्या पावसाने असा काही धुमाकूळ घातला की अवघ्या काही तासात होत्याच नव्हतं झालं. मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून ऑनलाईन माहिती अपलोड करण्यासाठी मोठा कालावधी लागला आहे. अशीच काही परिस्थिती आता अवकाळीच्या नुकसानभरपाईबाबत होऊ नये, अशी मागणी शेतकरी करत आहेत. भारत देश स्वतंत्र झाल्या नंतर शेतकऱ्यांचे प्रश्न समाजासमोर यायला ईतक्या वर्षानंतर शेतकरी कुटुंबाला अंत पाहावा लागत असेल तर ही देशासाठी नक्कीच लांच्छनास्पद गोष्ट आहे. आत्महत्येसारखे भीषण प्रकार वारंवार घडूनही शासन व्यवस्था काही केल्या जाग्या व्हायला तयार नाहीत. जगाचा पोशिंदा म्हणून ओळख असणारा शेतकरी राजा स्वतःच एकवेळच्या जेवणासाठी आज मोहताज झालाय. त्याच स्वैरसुतक गोरगरिबांचे कैवारी, बुलंद आवाज म्हणवून घेणाऱ्या राजकीय नेते मंडळींना नाही. सत्तेच्या सारिपाटावर खुर्ची की मिरची म्हणत



एकमेकांच्या जिरवा-जिर्वीचा डाव मांडून खेळण्यात ते दंग आहेत. नुकसान होऊन इतके उलटत आले तरी शासनाच्या लालफितीच्या कारभारात नुकसान ग्रस्त बळीराजा मात्र शासकीय मदतीकडे डोळे लावून बसला आहे. क्रांती केली काळ्या आईच्या कुशीत हिरव्यागार शेतीच सपान फुलवल! कापुस कांदा टमाटे शेतीत सतत नाविन्यपूर्ण क्रांती करून सुमधुर व डाळिंबाची अवीट गोडी सातासमुद्रापार पोहोचवली. कधी आवकाळी पाऊस तर कधी दुष्काळ व पाण्याचा वाणवा याचा कलंक कपाळी घेऊन जन्मलेल्या या तालुक्याची ओळख पांढ्या सोन्याची पंढरी'म्हणून करून दिली.

अपार कष्ट करण्याची जिद्द, दुःख सोसण्याची अफाट सहनशक्ती याच्या जोरावर त्याची शेतीत घोडदौड सुरूच राहिली. कधी आस्मानी तर कधी सुलतानी संकटाने मात्र त्याची पाठ सोडलीच नाही. कधी अत्यल्प पाऊस तर कधी पाऊस व पाण्याची कमतरता, कधी स्थानिक दलाल व परप्रांतीय व्यापारी यांच्या सनगनमताने दर पाडणे तर कधी व्यापाऱ्यांकडून गंडा, कधी खराब हवामान तर कधी अवकाळी गारपीट अशा नानाविध संकटांनी त्याच्या घामाने पिकवलेली शेती मातीत मिसळली गेली. कर्जाच्या बोझ्यात साहजिकच वाढ होत गेली. मात्र आपली राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी मतांचा जोगवा मागून या आगोदर मोर्चे, आंदोलन करून तालुक्यातील नेतेमंडळी मात्र वातानुकूलित गाडीत बसून फिरून लालबुंद झाली. मात्र तालुक्यातील जनता शेतीच्या विविध समस्येत पुरती काळवंडून गेली. कर्जबाजारी होत गेली. लाथ मारीन तिथं पाणी काढणारा तालुक्यातील जिगरबाज शेतकरी न थकला न थांबला गडी ऊन पावसाची वाऱ्या-वादळाची पर्वा न करता पक्षाप्रमाणे उंच उंच गगनभरारी घेतच राहिला. रणरणत्या उन्हात पोटच्या लेकरापेक्षांही जीवापाड जपलेल्या डाळींब मोसंबी जगवण्यासाठी टँकरचा आधार घेऊन बागा जगवल्या. डोक्यावर कर्जाच्या बोझ्याचा डोंगर घेऊन अविरत धडपड करत राहिला. या उक्तीप्रमाणे आशावादी राहून अपार कष्ट करत राहिला.पण यंदाच्या परतीच्या पावसाने मात्र त्याला पुरता नेस्तनाभूत केला. अच्छे दिनाचे त्याचे स्वप्न तालुक्यातील समाजकारणाच्या नावावर राजकारण करणाऱ्या नेतेमंडळी प्रमाणे परतीच्या पावसाने भंगले. तालुक्यातील हजारो हेकटर क्षेत्र उध्वस्त झाले, बाधित झाले. नेत्यांचे दौरे, शासकीय पंचनामे याचे सोपस्कर नेहमीप्रमाणे पार पडले.जसा नुकताच निवडणुकीचा धुरळा बसला तसाच नेत्यांच्या गाडींचा पाहणी दौरे करून हवेत विरला.पंधरा दिवस झाले तरी मायबाप सरकार म्हणून ज्यांच्याकडे मदतीची याचना करायची तीच मंडळी सत्ता-सुंदरीच्या नादात एकमेकाना वाकुल्या दाखवू लागली आहे. हीच मंडळी राजकीय डावपेच आखण्यात व्यस्त असल्याने सरकारच्या मदतीची त्याची प्रतीक्षा संपण्याचे नाव घेत नाही. पीक विमा कंपन्या मालामाल झाल्या पण बळीराजा म्हणुवून घेणाऱ्या या बळीची पिळवणूक मात्र थांबली नाही .खरीप गेला. रब्बीच्या पेरणीचा हंगाम ही सुर झाला असल्याने रब्बी ही हाताला लागण्याच्या आशा धूसर होत चालल्या आहेत. यांचं कधी मिळणार.. शासकीय मदत कधी मिळणार, असा संतप्त सवाल तालुक्यातील तमाम जनतेचा आहे. त्यांच्या तोंडातून एकच संतापजनक प्रतिक्रिया आहे' तुमचं होतंय राजकारण मात्र आमचं चाललंय मरण..

> **कुषी प्रधान देशात शेतकर्यावर आत्महत्येची वेळ दुर्दैवी :** शेतकऱ्यांना पैशासाठी बॅंका वर अवलंबून राहावे लागते तर शेतमाल विकण्यासाठी दलाल व व्यापारी यांच्यावर अवलंबून राहावे लागते यामुळे आवकाळी पावसामुळे अचणीत सापडलेल्या शेतकऱ्याच्या व्यथेकडे सरकार शेतकऱ्यांच्या डोळ्यातून वाहणारे पाणी का दिसत नाही . या कुषी प्रधान देशात शेतकऱ्यावर आत्महत्येची वेळ यासारखी दुर्दैवी गोष्ट कोणती आहे . **काकासाहेब मगर शेतकरी तलाडा**

# सामायिक विहिरीच्या पाण्यावरून जीवे मारण्याचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** सामायिक शेतीच्या विहिरीतील पाणी का उपसले



म्हणून रोहिदास भोसले सह पाच जणांनी लोखंडी गज व काठ्याने मारुती गाडीवान यास जबर मारहाण करून त्याचा हात फॅक्चर करुन आम्हाला जीवे मारण्याची धमकी दिल्याने शेवगाव पोलिसात भोसलेसह पाच जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, शेवगाव तालुक्यातील मौजे मुरमी येथील मारुती रंगनाथ गाडीवान वय 75 यांची मुरमी शिवारात शेती असून गट नंबर 40 मधील शेत जमिनीतील विहिरीत अर्धा हिस्सा म्हणून रोहिदास भीमराव भोसले यांना देण्यात आलेला असून चार दिवसाची दोघात पाण्याची बारी असते, दि. 3 एप्रिल रोजी सकाळी 11 वाजता मी व माझी पत्नी शारदा घरी जेवण करीत असताना आमचे गावातील अमोल रोहिदास भोसले , सोमनाथ रोहिदास भोसले, रोहिदास भीमराव भोसले , भीमराव शामराव भोसले सर्व रा. मुरमी येथील व रोहिदास भोसले यांचा मेहुनिचा मुलगा जालिंदर हे आमच्या घरात आले व म्हणाले, आमची पाण्याची बारी असताना तुम्ही विहिरीतील पाणी का उपसले , मी त्यांना म्हणालो की आजचा दिवस माझी बारी आहे , तुम्ही उद्यापासून विहिरीचे पाणी उपसा, असेच धंदा होऊन सांगत असताना अमोल रोहिदास भोसले आमची बरी असताना तू विहिरीचे पाणी उपसतो तुला आज दाखवतोच असे म्हणून त्याचे हातातील लोखंडी गजाने माझे डावी हाताच्या मनगटावर मारून मला दुखापत करून माझा हात फॅक्चर केला. त्यावेळी सोमनाथ रोहिदास भोसले यांनी लाकडी झाल्याने माझ्या पाठीत मारले, रोहिदास भोसले यांच्या मेहुणीचा मुलगा जालिंदर यांनी मला लाथा बुक्क्यांनी मारहाण केली त्यावेळी माझी पत्नी शारदा हि सोडवण्यासाठी आली असता रोहिदास भीमराव भोसले, भीमराव रामराव भोसले यांना ढकलून देऊन लाथाबुक्क्यांनी मारहाण करून पुन्हा आमच्या नादाला लागल तर मारून टाकू अशी धमकी दिली घराजवळच शेतात राहत असलेले आमचा मुलगा मला व आमच्या पत्नीला प्राथमिक उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले परंतु हाताचे हाड फ्रॅक्चर झाल्याने पुढील उपचारासाठी अहमदनगरच्या सिविल हॉस्पिटल ला रेफर करण्यात आले असून मारुती गाडीवान यांच्या जबाबावरून शेवगाव पोलिसात वरील इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जीआय-वन हॉस्पिटलमधे आरोग्यदिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** GI-One हॉस्पिटल, पोट ब लिव्हर विकार संस्था छत्रपती संभाजीनगर मार्फत ७ एप्रिल जागतिक आरोग्य दिनानिमित्त पोट व लिव्हर विकारावर विजय मिळवण्याच्या संदेशासह उत्साहात साजरा करण्यात आला.

जागतिक आरोग्य दिन, ७ एप्रिलचे औचित्य साधून जीआय-वन हॉस्पिटल पोट व लिव्हर विकार संस्था छत्रपती संभाजीनगर मार्फत विविध कार्यक्रम घेण्यात आले. ज्याद्वारे आपले पोट व लिव्हरचे आरोग्य उत्तम राखण्याकरिता जीआय-वन हॉस्पिटल पोट व लिव्हर विकार संस्थेचे संचालक डॉ. वैभव गंजेवार , डॉ. अशोक मोहिते, डॉ. विनय झंवर, डॉ. संदिप भालसिंग, डॉ. मुकेश राठोड, यांनी सर्वसामान्याना खालील संदेश दिला व आपले पोट व लिव्हर जपण्याकरिता आवाहन केले आहे. पोट व लिव्हरचे आरोग्य उत्तम असेल तरच आपण खऱ्या अर्थाने आनंदी राहून जीवनाचा परिपूर्ण आनंद घेऊ शकतो. ७ एप्रिल या जागतिक आरोग्य दिना निमित्ताने आयोजित सायकल रॅली करिता सर्व संचालक व कर्मचारी यांनी प्रत्येक व्यक्तीच्या स्वस्थ जीवन प्रणाली करिता शारीरिक व्यायाम म्हणून सायकल रॅलीला जीआय-वन हॉस्पिटल पोट व लिव्हर विकार संस्थेचे संचालक यांनी हिरवा झेंडा दाखवून सुरवात केली.

यावेळी संचालकांसह एकूण ६० अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग घेतला. सदरील रॅली जीआय-वन हॉस्पिटल समोरून रेल्वे स्टेशन, बाबा पेट्रोल पंप, क्रांती चौक, गोपाल टी हाउस, अहिल्याबाई होळकर चौक, मार्गे रेल्वे स्टेशन रोड ते जीआय-वन हॉस्पिटल पोट व लिव्हर विकार संस्था येथे पूर्ण केली व त्यानंतर समारोप केला. त्याच प्रमाणे "आरोग्य सर्वाकरिता" या जागतिक आरोग्य संघटनेच्या संकल्पनेची प्रभावी पणे जनजागृती केली. शारीरिक स्वास्थ बरोबरच पोट व लिव्हर विकार संस्थेचे कार्यपद्धतीत आहाराचे महत्व जनतेपर्यंत पोहचवणे करिता " पोषक



आहार पाककृती स्पर्धा" शनिवार रोजी घेण्यात आली. पोषक आहार पाककृती तयार करून त्याचे आहारातील महत्व, बनवण्याची पद्धती, वापरलेले साहित्य याचे पोट व लिव्हर संस्थेचे कार्यपद्धतीत महत्व पटवून दिले. सायकल रेली नियोजनाकरिता पोलीस विभागामार्फत पोलीस आयुक्त कार्यालय, तसेच वेदांतनगर , उस्मानपुरा व क्रांती चौक पोलीस स्टेशन व ट्राफिक कंट्रोल विभागाचे सहकार्य लाभले.




## एलॉन मस्क आणि मोदी

आधुनिक केसरी

एक मायक्रोब्लॉगिंग साईट आहे. याचे सीईओ आहेत. एलॉन मस्क यांनी सोशल मीडिया वेबसाईट ट्विटरवर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फॉलो करण्यास सुरुवात केली आहे. अब्जाधीश एलॉन मस्क हे जगातील निवडक राजकारण्यांना फॉलो करतात. उल्लेखनीय बाबा म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदींना ट्विटरवर ८७ दशलक्षापेक्षा जास्त वापरकर्ते फॉलो करतात. नरेंद्र मोदी हे वापरकर्त्यांद्वारे जगातील सर्वाधिक फॉलो केले जाणाऱ्या राजकारण्यांपैकी एक आहेत. एलॉन मस्क यांच्या ट्विटर अकाऊंटवर होणाऱ्या हालचालींचा मागोवा घेणाऱ्या Elon Alerts या ट्विटर अकाऊंटने सर्वप्रथम ही माहिती शेअर केली. एलॉन मस्क यांनी पंतप्रधान मोदी यांना फॉलो केल्यानंतर सोशल मीडिया वापरकर्त्यांनी यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. ट्विटर वापरकर्ते म्हणाले, एलॉन मस्क हे पंतप्रधान नरेंद्र मोदींना फॉलो करत आहेत म्हणजेच टेस्ला कारची लवकरच भारतात एंट्री होणार आहे. एलॉन मस्क हे जगातील १७५ ट्विटर अकाउंट्सला फॉलो करतात. यामध्ये ट्विटर आणि अन्य कंपनीच्या अकाउंट्सचा समावेश आहे. याशिवाय अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा ,ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक आणि मायक्रोसॉफ्टचे चेअरमन सत्या नडेला अशा अनेक प्रसिद्ध लोकांना मस्क फॉलो करतात. एलॉन मस्क यांनी पंतप्रधान मोदींना ट्विटरवर फॉलो केल्यावर टेस्ला भारतात लवकरच प्रवेश करणार अशा शक्यता बांधल्या जात आहेत. एकूण १३४ दशलक्ष लोकं एलॉन मस्क यांना ट्विटरवर फॉलो करतात.

## सामान्यांना स्वस्त उपचार कधी मिळणार ?



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**जागतिक आरोग्य संघटना (WHO) ही एक अशीही जागतिक संस्था आहे जी जगातील सर्व देशांच्या आरोग्याशी संबंधित समस्यांवर परस्पर सहकार्य आणि मानके विकसित करते. त्याचबरोबर तिचे मुख्य काम म्हणजे जगभरातील आरोग्य समस्यांवर लक्ष ठेवणे आणि त्या सोडवण्यासाठी सहकार्य करणे हे आहे. आणि या संस्थेने 'स्मॉल पॉक्स' सारख्या आजाराचे उच्चाटन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती आणि टीबी, एड्स, पोलिओ, ॲनिमिया, अंधत्व, मलेरिया, सार्स, मर्स, इबोला यांसारख्या धोकादायक आजारांनंतर कोरोनाला रोखण्यात गुंतली आहे.**

जगातील प्रत्येक व्यक्ती शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या निरोगी असावी, यासाठी या संस्थेच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. त्याचे पहिले उद्दिष्ट जागतिक आरोग्य सुधारणे हे आहे, परंतु हे लक्ष्य साध्य करण्यासाठी समाजातील सर्व लोकांना आवश्यक आरोग्य सुविधा मिळतात का नाही, याची खात्री करणे अत्यंत आवश्यक आहे. पण जेव्हा अमेरिकेसारखा विकसित देशही कोरोना व्हायरससमोर असहाय दिसत होता आणि आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक वस्तूंचा मोठा तुटवडा होता, तेव्हा साऱ्या जगाच्या लक्षात आले की, जनतेला आरोग्य सुविधा देण्यासाठी अजून खूप काही करावे लागणार आहे. जागतिक आरोग्य संघटनेनेच हे मान्य केले आहे की आजही जगातील किमान निम्म्या लोकसंख्येला अत्यावश्यक आरोग्य सेवा उपलब्ध नाहीत.

आरोग्य क्षेत्रात गेल्या काही दशकांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे क्रांती झाली असली तरी एड्स, कॅन्सर यांसारख्या जीवघेण्या आजारांबरोबरच हृदयविकार, मधुमेह, क्षयरोग, लठ्ठपणा, ताणतणाव यासारख्या आरोग्याच्या समस्या ज्या प्रकारे लोकांमध्ये झपाट्याने वाढत आहेत, त्यामुळे आरोग्य क्षेत्रातील आव्हानेही सातत्याने वाढत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, भारतात कर्करोग, मधुमेह, स्ट्रोक, हृदयविकार आणि फुफ्फुसाच्या आजारांमुळे दरवर्षी 58 लाख लोकांचा मृत्यू होतो, जो जगात सर्वाधिक आहे. असे असले तरी येत्या काही वर्षांत आधुनिक वैद्यकीय पद्धती आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने टीबी, कॅन्सर आणि एड्ससारखे घातक आजार रोखण्यासाठी प्रभावी मार्ग सापडतील आणि लोक निरोगी जीवन जगू लागतील, असा सरकारचा दावा आहे. पण तज्ज्ञांच्या मते, काही आजार येत्या काळात मोठी समस्या म्हणून समोर येतील. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (आयएमए) मते, देशात सिरोसिसच्या रुग्णांची संख्या वाढत आहे, त्याशिवाय टायफॉइडसारख्या जलजन्य आणि संसर्गजन्य रोगांवर नियंत्रण ठेवण्याचे मोठे आव्हान आहे. सध्या देशातील वृद्धांची लोकसंख्या सुमारे चार टक्के आहे, जी 2050 पर्यंत चौदा टक्क्यांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत स्मृतिभ्रंश सारखा आजार मोठ्या प्रमाणात उद्भवू शकतो. या काळात स्मृतिभ्रंश रुग्णांची संख्या 197 टक्क्यांनी वाढू शकते, असे मानले जात आहे. या परिस्थितीत, वृद्धांसाठी घरगुती काळजी घेण्यासाठी विशेष सेवांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असेल.

2050 पर्यंत देशात एकोणीस कोटींहून अधिक हृदयरोगी असतील असा अंदाज आहे. आंतरराष्ट्रीय मधुमेह महासंघाच्या अहवालानुसार देशातील मधुमेही रुग्णांची संख्या 2030 पर्यंत 10.1 कोटी आणि 2045 पर्यंत 13.42 कोटी असू शकते. त्याचप्रमाणे, सुमारे 29.3 टक्के लोक उच्च रक्तदाबाच्या समस्येने त्रस्त आहेत, ज्यांची संख्या 69.3 टक्क्यांपर्यंत वाढू शकते. ऑक्सफॅम इंटरनॅशनलच्या असमानतेच्या निर्देशांकानुसार, जीडीपीच्या संदर्भात आपल्या नागरिकांच्या आरोग्यावर खर्च करण्याच्या बाबतीत भारत 161 देशांपैकी 157 व्या क्रमांकावर आहे. आरोग्यावरील खर्चाच्या बाबतीत, भारत ब्रिक्स देश आणि त्याचे शेजारी पाकिस्तान (4.3 टक्के), बांगलादेश (5.19 टक्के), श्रीलंका (5.88 टक्के), नेपाळ (7.8 टक्के) इत्यादींच्या मागे आहे. अमेरिका आपल्या




GDP च्या 16.9%, जर्मनी 11.2%, जपान 10.9%, कॅनडा 10.7%, युके 9.8% आणि ऑस्ट्रेलिया 9.3% आरोग्यसेवेवर खर्च करते. भारतातील मुलांमध्ये वेस्टिंग (उंचीनुसार कमी वजन) सध्याची स्थिती 19.3 टक्के आहे, जी सन 2000 मधील 17.15 टक्क्यांपेक्षा वाईट आहे.देशातील एक चतुर्थांश मुले अजूनही लसीकरण कार्यक्रमापासून वंचित आहेत. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात आरोग्यासाठी एकूण आर्थिक तरतूद सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) 2.1 टक्के ठेवण्यात आली आहे, तर नीती आयोग, ग्रामीण सांख्यिकी, राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेच्या आकडेवारीनुसार, जीडीपीच्या 2.5 टक्क्यांहून अधिक आरोग्यावर खर्च करणे आवश्यक आहे. विविध आकडेवारीनुसार, देशात 543 वैद्यकीय महाविद्यालये आहेत, मात्र किमान 600 वैद्यकीय महाविद्यालये, 50 एम्स आणि 200 सुपर स्पेशालिटी रुग्णालयांची गरज आहे. एकूण 810 जिल्हा रुग्णालये (डीएम) आणि 1193 उपविभागीय रुग्णालये (एसडीएम) आहेत. 2018-19 च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, साठ टक्के प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये एकच डॉक्टर उपलब्ध आहे, तर पाच टक्के ठिकाणी एकही डॉक्टर नाही. जवळपास 32 टक्के गावकऱ्यांना अजूनही जवळच्या हॉस्पिटलमध्ये पोहोचण्यासाठी किमान पाच किलोमीटर पायपीट करावी लागते. गेल्या वर्षी केंद्राच्या ग्रामीण आरोग्य अहवालात असे सांगण्यात आले होते की, ग्रामीण भागातील पाच हजारांहून अधिक सामुदायिक आरोग्य केंद्रांमध्ये बावीस हजार तज्ज्ञ डॉक्टरांची गरज आहे, तर मंजूर पदे केवळ 13 हजार 637 आहेत आणि अद्यापही 9 हजार 268 पदांवर नियुक्ती झालेली नाही. अनेक राज्यांमध्ये रिक्त पदांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. 2005 मध्ये जिथे तज्ज्ञ डॉक्टरांची 46 टक्के कमतरता होती, ती आता 68 टक्के झाली आहे. ग्रामीण भागात प्रशिक्षित डॉक्टरांव्यतिरिक्त नर्सिंग स्टाफ, रेडिओग्राफर, लॅब टेक्निशियन इत्यादी संबंधित वैद्यकीय कर्मचाऱ्यांचीही कमतरता आहे.

ग्रामीण भारतात सरकारी रुग्णालयांमध्ये दर सत्तर हजार लोकसंख्येमागे फक्त 3.2 खाटा आहेत, जे जागतिक आरोग्य संघटना (WHO) च्या शिफारस केलेल्या पातळीपेक्षा खूपच कमी आहेत. ग्रामीण आरोग्य सेवेबाबत सरकारची अशी उदासीनता अत्यंत चिंताजनक आहे आणि जागतिक आरोग्य संघटना आणि युनिसेफ सारख्या संस्थाही या दिशेने कोणतेही अर्थपूर्ण प्रयत्न करताना दिसत नाहीत ही चिंतेची बाब आहे. मात्र, सार्वत्रिक, स्वस्त आणि दर्जेदार आरोग्य सेवा देण्याच्या उद्देशाने सरकारकडून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, आयुष्मान भारत यांसारख्या काही कार्यक्रमांतून सकारात्मक पाऊले उचलली जात आहेत.

2018 मध्ये लॅन्सेट जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अहवालात म्हटले आहे की भारतात दरवर्षी सुमारे 24 लाख लोकांचा मृत्यू केवळ खराब आरोग्य सेवेमुळे होतो. आरोग्य सेवेच्या अपुऱ्यापणामुळे आठ लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू होतो. ही अत्यंत चिंतेची बाब आहे की भारत अशा देशांपैकी एक आहे जिथे सामान्य नागरिक आरोग्य सेवेसाठी जास्तीत जास्त खिशातून पैसा खर्च करतो आणि यातील बहुतांश पैसा औषधे खरेदीवर खर्च होतो. नागरिकांना मिळणाऱ्या आरोग्य सेवांपैकी अठ्ठ्याहत्तर टक्के सेवा खासगी रुग्णालये आणि डॉक्टरांच्या माध्यमातूनच पुरवल्या जात आहेत. देशातील सुमारे ऐंशी टक्के नागरिकांकडे कोणताही आरोग्य विमा नाही. अशा स्थितीत सर्वसामान्यांना स्वस्त आणि परिणामकारक उपचार सुविधा मिळणे किती अवघड आहे, हे समजू शकते. आरोग्य सेवेच्या नव्वद टक्के गरजा प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून पूर्ण केल्या जाऊ शकतात, हे अलीकडेच सरकारने मान्य केले आहे, परंतु त्यासाठी या आरोग्य केंद्रांची कमतरता दूर करण्यासाठी गांभीर्याने प्रयत्न करताना डॉक्टरांची कमतरताही दूर करणे आवश्यक आहे.

## महान समाजसुधारक महात्मा फुले




रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**महात्मा फुले हे महान समाजसुधारक होते.त्याच्याच प्रयत्नातून आपल्याला आज समाजात एकता व बंधुता दिसून येते. महात्मा जोतिबा फुले यांचा जन्म 11 एप्रिल 1827 ला सातारा जिल्ह्यातील कटगुण या गावी झाला. जन्मताच समाज सुधारणेची तळमळ त्यांच्यामध्ये होती. त्यामुळे आज संपूर्ण भारतात महात्मा फुले यांना समाजसुधारक म्हणून मोठ्या आदरतीत्थाने ओळखले जाते. महात्माफुले कर्तृत्ववान महापुरुष होते.त्यामुळेच त्यांच्यात आपल्याला समाज सुधारणेचे संपूर्ण गुण पहायला मिळतात.**

महात्मा फुले सामाजिक प्रबोधनकार, भारतीय सामाजिक कार्यकर्ते, महान विचारवंत, समाजसुधारक, उत्कृष्ट लेखन, स्त्रियांना व समाजातील लोकांना शिक्षीत करने,जातीय व्यवस्थेचे निर्मुलन इत्यादी अनेक महान कार्याने आज महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात मोठ्या सन्मानाने महात्मा फुलेंना ओळखले जाते. त्यामुळेच आज संपूर्ण भारत त्यांच्या कार्यापुढे नतमस्तक होतो. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रत्येक कार्यात त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना फुले त्यांच्या सोबत रहात असत.त्यामुळे सामाजिक कार्यात त्यांचा सुध्दा तेवढाच महत्त्वाचा वाटा दिसून येतो. सावीत्रीबाई फुले भारतातील पहील्या महीला शिक्षणाच्या जनक होत्या. आज महाराष्ट्रात शिक्षणामध्ये जी काही सुधारणा, आमुलाग्र बदल व विविधता दिसून येते त्यांचे संपूर्ण श्रेय महात्मा ज्योतिबा फुलेंना व सावित्रीबाई फुलेंना जाते. महात्मा जोतिबा फुले यांचे एवढे महाग कार्य आहे की महाराष्ट्रासह संपूर्ण भारत कधीच विसरणार नाही. कारण सन १८६९ साली महात्मा जोतिबा फुले यांनी रायगडावरील शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली व त्यांच्या जीवनावर सर्वप्रथम पोवाडा लिहिला.शिवाजी महाराजांचे कार्य लोकांपर्यंत पोहोचावे यासाठी फुलेंनी सन १८७० साली शिवजयंतीची सुरूवात केली. ती पहिली शिवजयंती होती.त्यानंतर शिवजयंतीच्या माध्यमातून लोकांना एकत्र करण्याचे काम लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी केले. २० व्या शतकात



डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील शिवजयंती साजरी केली व दोन वेळा शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या थाटात शिवजयंतीला सुरूवात झाली. म्हणजेच महात्मा जोतिबा फुले समाजसुधारक तर होतेच परंतु शिवरायांच्या समाधीचा शोध लावुन इतिहास जागृत केला त्यामुळे त्यांच्यात आपल्याला दैवी शक्तीचे रूपही पहायला मिळते. अशा क्रांतिकारक महान समाजसुधारक ज्योतिबा फुलेंना कोटी कोटी प्रणाम. महात्मा ज्योतिबा फुलेंनी समाज सुधारण्यासाठी दिशा दिली व समाजामध्ये सुधारणा झाल्याचे आपण पहातो. त्याचप्रमाणे आज त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून आज निसर्गाला वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. महात्मा फुलेंच्या जयंती निमित्त महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे. कारण आज समाज अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करीत आहे. परंतु दिवसेंदिवस निसर्गाचा ह्रास होत आहे. त्याला वाचविण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. त्यामुळे जयंती निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होणे अत्यंत गरजेचे आहे.यातच आपल्याला महात्मा ज्योतिबा फुले यांचे आचार-विचार अवश्य दिसून येईल व प्रत्येक झाडाच्या पानात, फळात, फुलात महात्मा फुलेंचे दर्शन अवश्य होईल. जय हिंद.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षण



डॉ. हर्षवर्धन कांबळे
संपर्क ९८२२५९३७५७

आधुनिक केसरी

**'शिक्षण हे वाघिणीचे आहे दूध आणि जो ते प्राशन करेल ,तो गुर्गुरल्या शिवाय राहणार नाही.' असे क्रांतिकारी विचार, देशातील मागास बांधवांना देण्याचे महान कार्ये भारत रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केले. प्राथमिक शिक्षण हा सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार आणि गुणवतेचे असावे . शिवाय प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की मुलगा किव्वा मुलगी एकदा शाळेत दाखील झाली की, ते पूर्णपणे सुरक्षित व गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडावे. शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे ,असे मत त्यांनी मांडले होते. आणि त्यासाठी संविधानात तशी तरतूद करुन ठेवली. समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे.**



शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बुध्दीने सशक्त होतो.व्यक्तीला चांगले वाईट यातला फरक समजू लागतो. प्रज्ञा शील करुणा या गुणांना प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज आहेच,असे सातत्याने ते सांगत असत. भारतातील प्राचीन हिंदू वैदिक समाजातील जातींच्या ठरवलेल्या नियमानुसार कनिष्ठ जातींना शिक्षण घेण्याचा कोणताच अधिकार नव्हता .जर समजा शिक्षण विषयक कोणत्या गोष्टी कनिष्ठ जातीतील लोकांनी ऐकल्या तर त्यांना मनुस्मृतीच्या दंडविधान अंतर्गत शिक्षा होत असे. ज्यांनी जात चोरून किव्वा लपून- छपून शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला तर त्यांना कठोर शिक्षा देण्याचे प्रावधान होते. तपस्वी शूद्र शंभुकाची हत्या, आदिवासी एकलव्य चा कापलेला अंगठा, शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळा नाकारण्यात आले होते, वगैरे सारखी अनेक उदाहरणे या विषयी सांगता येतील. सर्व स्त्रियांना हेतुपुरस्सर शिक्षणा पासून वंचित ठेवण्यात आले होते. अश्या विषम परिस्थिती मध्ये उच्च शिक्षण घेवून साऱ्या समाजाला शिक्षणाचा मार्ग दाखवणे हे कार्य फारच श्रेष्ठ कार्य त्यानी केलेले आहे. औरंगाबादला १९ जून १९५० ला मिलिंद महाविद्यालयाची मुहूर्त मेढ रोवली ,तेव्हाची शिक्षणाची परिस्थिती जर पाहिली तर लक्ष्यात येते की निजाम प्रांत म्हणजेच हैदराबाद संस्थान मध्ये पूर्वी मराठवाडा भाग समाविष्ट असायचा या प्रांतात शालेय शिक्षण विषयक परिस्तिथी फारच खराब होती. सन १९३१ ला या प्रांतात साक्षेरतेचे प्रमाण केवळ ५ टक्के होते,१९४१ ला ९.३ टक्के होते, सन १९४८-५० या दरम्यान हैदराबाद संस्थानात केवळ १७ महाविद्यालये आणि केवळ ७६१५ विद्यार्थी होते.याच कालखंडात मुंबई राज्यात ५० महाविद्यालय मध्ये ५० हजार ३५९ विद्यार्थी शिक्षण घेत होते. शिवाय माध्यमिक शिक्षेचा प्रसार प्रचार फारच मंद होता. आणि त्यातला त्यात तर दलितांची शाळेतील उपस्थिती तर नगण्यच होती.या सर्व परिस्थितीचा पूर्ण अभ्यास करून औरंगाबादचा १५० ऐकर च्या विस्तिर्ण परिसरात मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. व या परिसरास नागसेन वण हे नाव दिले. हे कॉलेज साऱ्या वंचित लोकांसाठी हक्काचे शिक्षणाचे केंद्र बनलेले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या शिक्षण संस्थांना मिलिंद, सिद्धार्थ, नागसेन वन आणि पीपल्स एज्युकेशन अशी सुंदर नावे दिलीत. जे विचार



भीमजयंती विचारमाला
भाग : तीन

स्वातंत्र्य, लोकशाही यांचे प्रतीक आहेत. लोकांमध्ये शिक्षणाविषयी प्रचंड चेतना निर्माण होईल असे बुद्ध धम्मशी जुळलेले नाव त्यांनी देले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तीन गुरूंना अग्रस्थानी मानायचे सिद्धार्थ गौतम बुद्ध, महात्मा ज्योतिबा फुले,आणि संत कबीर . तिन्ही आदर्श महापुरुष साऱ्या मानव जातीला आदी कल्याण मध्य कल्याण आणि अंतिम कल्याण मार्गाकडे घेवून जाणारे आहेत.तसेच ज्योतिबा फुले म्हणायचे "विद्याविना -मती गेली ,मती विना -गती गेली ,गती विना -वित्त गेले, वित्त विना -शूद्र खचले , येवढे अनर्थ एका अविद्देने केले. " म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर हा अनर्थ टालण्यासाठी जीवनभर कार्यरत राहिलेत .शाळा, कॉलेज,वसतिगृह, शिष्यवृत्ती,आणि आरक्षण यांनी सांगड घालत अविद्यातून- विद्यकेडे सर्व मागास वंचितांना घेवून गेलेत.आज परिस्थिती बरीच सुखद झालेली आहे . शिकून सवरून मागास जातींची मुले मुली फार मोठं मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. सर्वांचीच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा, वाचलं तर वाचाल, किंवा शिका- संघटित व्हा- संघर्ष करा, हे मंत्र अंगिकारलेले दिसतात. डॉक्टर,वकील, प्राध्यापक, सनदी अधिकारी, आणि इंजिनियर झालेले चहूबाजूंनी बघावयास मिळत आहेत. सर्वत्र शिक्षणाची अव्याहत गंगा वाहत आहे. शिक्षणाची टक्केवारी उच्च स्तर गाठत आहे, याचे सारे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जाते. आजच्या २१ व्या शतकात सुद्धा डॉ बाबासाहेब आंबेडकर साऱ्या भारतीयांचे शिक्षणातील सर्वात मोठे आदर्श पुरुष आहेत. म्हणुनच तर देशातील सर्व शाळा,कॉलेज, महाविद्यालय, विश्व विद्यालय येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रेरणादाई फोटो बघावयास मिळतो.

# पोरकट राजकारणी आणि राजकारणातील पोरकटपणा



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**मागच्या वर्षी आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या दिमाखात साजरा केला. येणाऱ्या १४ एप्रिल ला आपण सर्वजण देशभर नव्हे तर जगभर माहमनाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंतीही उत्साहात साजरी करणार हे नक्कीच त्या निमित्ताने सर्व भारतवासीयांना खूप खूप शुभेच्छा व घटनाकारास विनम्र अभिवादन. मी या ठिकाणी महामानवाचा उल्लेख मुद्दामच करत आहे कारण देशासह जगालाही हेवा वाटावी अशी घटना व लोकशाही त्यांच्या नेतृवाने आपणास दिली.**

आपली भारतीय लोकशाही ७५ वर्षांची झाली.. म्हणजेच आपण "शहाणे" झालोत. घटनाकारांनी घटनेत जसे अधिकार दिलेत तसेच कर्तव्ये देखील दिलेले आहेत. सर्वांनाच सर्व बाबतीत स्वातंत्र्य दिले पण सोबत काही मर्यादाही दिलेल्या आहेत. म्हणूनच घटनेपुढे कुणीही श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नसून त्यातून स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि स्वाभिमानाची शिकवण दिलेली आहे. म्हणूनच कुणालाही बेजाबाबदरीने व अमर्यादपणे वागता बोलता येत नाही. याचा अर्थ कुणीही मर्यादे पलीकडे जाऊन आपले वर्तन स्वैराचारी वृत्तीने करू शकत नाही याचे सर्वांना भान असणे गरजेचे आहे. त्यातल्या त्यात जे लोक प्रतिनिधी जनप्रतिनिधी म्हणून निवडून जाऊन जनतेचे नेतृत्व करतात त्यांच्यावर तर सर्वसामान्य नागरिकांपेक्षा जास्तीची बंधने व जबाबदाऱ्या घालण्यात आलेल्या असल्यामुळे आमदार, खासदार, मंत्री म्हणून शपथ घेतल्यावर अशा मंडळींनी सार्वजनिक क्षेत्रात वावरत असतांना अतिशय संयम, सहनशीलता व संवेदनशीलतेने समाजात वागले पाहिजे असे लिखित आहे. वर्तमान राजकारणात राजकीय पुढारी जे आप आपल्या पक्षांचे प्रतिनिधित्व करतात ते तर भान गेलेल्या माणसांसारखे खुलेआम वाट्टेल तसे निर्लज्जपणे बोलत व वागत आहेत हे भारतीय लोकशाहीत अतिशय लज्जास्पद व निंदनीय आहे. घरातले व समाजातले कर्ते धर्ते म्हणवणारे जनप्रतिनिधी जर सार्वजनिक ठिकाणी बेमालूमपणे एकमेकांबद्दल तोल सोडून बोलत असतील तर सर्वसामान्य जनतेने काय व कसे यांचे अनुकरण करावे हा जनतेसमोर यक्षप्रश्न उभा आहे. उठसुठ लोकप्रतिनिधी अथवा आजी-माजी मंत्र्यांनी एकुणमेकांवर अतिशय खालच्या थराला जाऊन अपशब्द वापरत असतील तर कसा बरे यांच्या पदाचा आदर्श जनसामान्यांनी घ्यावा ?. ? घटनाकारांनी स्वातंत्र्याचा अधिकार दिला याचा अर्थ स्वैराचारी व बेताल वक्त्यवे करण्यास नव्हे. मान्य आहे सत्ताधारी केंव्हा विरोधक असतात तर, विरोधक ही कधी सत्ताधारी होऊ शकतात याचा अर्थ सत्ता हातातून गेली म्हणून छोट्या-छोट्या गोष्टींवर काहीतरी खुसपटे काढून बेजबाबदार वक्तव्य करणे याला स्वातंत्र्य अथवा मर्दुमकी म्हणता येणार नाही. आपण काय व कसे होतो, आपले पूर्वज किती स्वाभिमानी व संयमी होते अशा इतिहासाचा आपल्या प्रत्येक पुढाऱ्यांना विसर पडता कामा नये. सत्ता व पैसा ही क्षणिक साधने आहेत, प्रामाणिक जनसेवा हे जनपुढाऱ्यासाठी साध्य आहे म्हणून साध्य साधून घेण्यासाठी प्रामाणिक, संयमी व सहनशील राहून साधक होऊनच साध्यप्राप्ती करावी लागते. हातून सत्ता गेल्यामुळे उठसुठ अर्वाच्य बोंबा मारून नव्हे. वर्तमान राजकारणात राजकारणी लोकांनी म्हणजे जनप्रतिनिधींनी अतिशय निर्लज्ज पणाचा कळस गाठून बेताल बोलून सामान्यांसामोर आपल्या गलिच्छ वर्तन संस्कृतीचे प्रदर्शन करण्याची जणू स्पर्धाच सुरू केली आहे असे सुज्ञास वाटत आहे. खरे सुज्ञ तर अशा गलिच्छ व चिखलफेकीच्या राजकारणापासून कोसो दूर दिसतात. आधी सत्ता मग पैसा आणि पैश्याच्या मस्तीमुळे तसेच परिपक्व बुद्धी अभावामुळे असे चित्र आम राजकारणात नेहेमीच दिसत आहे. अशा बेपर्वा वागणुकीमुळे ही मंडळी दिवसेंदिवस सैराटासारखी वागत असून यांचा न्याय व्यवस्थेवरीलही विश्वास उरलेला नाही. आचारविचार व वागणुकीत असा बेजबाबदारपणा राहूनही न्यायव्यवस्थेने यांच्या अशा वागणुकीचे समर्थन करून यांना न्याय मिळावा व जर असे होत नसेल तर न्यायव्यवस्थेच्या विरोधातही ही मंडळी न्याय व्यवस्थेलाही मॅनेज्ड सिस्टीम म्हणून आरोप प्रत्यारोप करून न्यायव्यवस्थेसह समाजाचे वातावरण दूषित करून जनतेत गैरसमज निर्माण करून समाजासमाजात तेढ निर्माण करण्याचा यांचा कायम उपद्व्याप चालू आहे. भविष्यातील सत्ता प्राप्तीसाठी रान उठविणारी अशी सर्व "उपद्व्यापी" मंडळी एकत्र येऊन आपले उपद्व्याप दाबून टाकण्यासाठी सीबीआय, इडी सारख्या शासकीय यंत्रणेवरही अविश्वास दाखवून काय सिद्ध करू इच्छितात ? खरेच हे जर उपद्व्यापी नसतील तर यांना अशा चौकाशींना घाबरण्याचे कारण नसावे. यांनी केलेल्या उपद्व्यापी चौकशा बंद व्हाव्यात म्हणून न्यायालयापर्यंत पोहोंचून कसे तोंडघाशी पडतात हे आपण बघितले आहे. यालाच चोराच्या उलट्या बोंबा म्हणणे वावगे नसावे. जनसामान्याला मात्र यात काय खरे तथ्य आहे, खरा कोण व खोटा कोण हे ओळखण्याइतपात जनता व न्यायव्यवस्था वेडी नाही. संसद अथवा विधिमंडळासारख्या पवित्र ठिकाणी ही मंडळी जनतेचे प्रतिनिधित्व करत असतांना सभागृहाला कसा कुस्त्यांचा आखाडा बनवून जनतेच्या पैश्याची उधळपट्टी करतात, लोकशाहीत किंवा घटनेनुसार आपल्या स्वार्थासाठी असे वर्तन करण्याचे अधिकार यांना कुणी दिले ? कुणी डोळे मारतात, कुणी माईक तोडतात, कुणी अन्य प्रकारे जनसंसाधनाचे वाटोळे करून आपली शेखी मिरवत असतील तर यांना लोकप्रतिनिधी म्हणून राहण्याच्या काय अधिकार ? आपल्या न्यायहक्कांच्या मागण्या साठी कायदेशीर बाबींचा आधार घेऊन जनतेचे प्रश्न शांतता व संयमाने ही सोडवता येतात.

वर्षांनुवर्षे पिढ्यानपिढ्या सत्तेत राहून राज्य व देशाची या उपद्व्यापी मंडळींनी वाट लावलेली असतांना आतातरी आपला पोरकटपणा सोडून संयमी, सहनशील, प्रामाणिक व सदाचारी वृत्तीने राहून समाजासमोर आपला आदर्श ठेवावा अन्यथा असा पोरकटपणा अंगलट येऊन "पप्पू" सारखी अवस्था न हो एवढीच माफक अपेक्षा जनतेला आहे.

महाराष्ट्र Business Katta













# केशवराव बाहेकर- ध्येयनिष्ठ नि:स्वार्थ नेता

आधुनिक केसरी

**अरमान सिर्फ उतने ही अच्छे है, जहाँ स्वाभिमान गिरवी रखने की जरूरत ना पडे... केशवराव जयवंतराव बाहेकर म्हणजे भाजपा चा खऱ्या अर्थाने पहिला बहुजनवादी चेहरा असे म्हंटले तर अजिबात चुकीचे होणार नाही. स्व. गोपीनाथजी मुंडे, स्व. पांडुरंगजी फुंडकर यांनी भाजपाला बहुजनांपर्यंत पोहचविले असले तरीही त्यापूर्वी बहुजनांपर्यंत जनसंघाला आणि त्यानंतर भाजपाला विशेषतः बुलढाणा जिल्ह्यात कुणी पोहचविले असेल तर ते केशवराव बाहेकरांनीच ! आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांच्या सहवासात आणि त्यांच्याच आदेशावरून संघाची स्थापना करत घोड्यावर खेडोपाडी फिरून केशवराव बाहेकर यांनी परिसरातील इतरांच्या मदतीने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य, जनसंघ आणि त्यानंतर भाजपा पोहचविली त्यातल्या त्यात अटीतटीच्या काळात जनसंघाचा दिवा पेटता ठेवला तर भाजपाचे कमळ सुकणार नाही याची काळजी घेतली.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र. : 9422880080

5,6 दिवसांपूर्वी चिखली तालुक्यातील किन्होळा या त्यांच्या मूळगावी डॉ. शेषराव बाहेकर यांनी केशवराव बाहेकर यांच्या जीवनकार्यावर 'जीवन संग्राम' हे पुस्तक काढून त्याचा सोहळा किन्होळा येथे मान्यवरांच्या आणि लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत संपन्न पार पाडला. स्व. केशवराव बाहेकर यांच्याशी संबंधित सोहळ्याला उपस्थित राहण्याची अतीव इच्छा असूनही ते शक्य झाले नाही मात्र यावेळचा गोडवा केशवराव बाहेकर यांना समर्पित करण्याचा विचार तेव्हाच मनात आला आणि स्व. केशवराव बाहेकर यांच्याशी संबंधित आठवणींच्या गाठोड्याची गाठ आपसूकच सुटायला लागली.

मला नुकतंच थोडंस कळत असेल तेव्हापासून मी स्व. केशवराव बाहेकर यांना ओळखतो.साधारणतः १९८२-८३ चा तो काळ असावा, मी बाबाचे बोट धरून त्यांच्या सोबत शिवाजी शाळेत गेलो. माझे बाबा सुल्तानपूर च्या शिवाजी विद्यालयावर तेव्हा मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. एका पांढऱ्या शुभ्र अँबेसीटर कार मध्ये सुल्तानपूरच्या बसस्थानकावर स्व. केशवराव बाहेकर आले आणि जवळच असलेल्या भानापुरे यांच्या जागेतील शाळेत त्यांनी बाबा आहेत की नाही ते बघण्यासाठी कुणीतरी व्यक्ती पाठवला. त्यांचे नाव कळताच बाबा मला सोबत घेऊन बस स्थानकावर आले आणि बुलढाणा केंद्रीय सहकारी बँक व तेव्हाच्या ग्रामपंचायतीच्या इमारती समोर पांढरे शुभ्र धोतर,तितकाच नीटनेटका पांढरा ,तीन बटणाचा सदरा आणि डोक्यावर भगवी टोपी परिधान केलेला,राजबिंडे रूप असलेल्या ह्या माणसाला मी पहिल्यांदाच बघत होतो.

बाबा येताच दोघांच्या चेहऱ्यावरील अगदी आतून आलेले स्मित बघत असतांनाच बाबांनी मला घरी जाण्याचे सांगितले आणि मी घरी निघून गेलो. त्याही न कळत्या वयात मला त्यांचा तो रुबाबदार पोशाख आणि त्यांची बघावीशी वाटणारी अँबसीटर माझं लक्ष वेधून घेत होती. खरं म्हणजे कीन्होळा हे माझ्या मामाचे गाव. कीन्होळा येथील पोलीस पाटील आणि रेणूकाबीज प्रक्रिया चे उपाध्यक्ष रमेशराव बाहेकर पाटील हे माझे मामा. स्व केशवराव बाहेकर हे कीन्होळा येथील आणि विशेष म्हणजे त्यांची सासुरवाडी आमच्या ब्रम्हपुरी येथीलच,माजी सभापती स्व. ॲड एस.टी. म्हस्के यांची आत्या,त्र्यंबकराव म्हस्के यांची बहीण त्यांना दिलेली. परशराम निंबाजी म्हस्के यांना ६ मुली आणि एक मुलगा. त्यातील सर्वात मोठी मुलगी कलाबाई ही केशवराव बाहेकर यांची सुविद्य पत्नी. म्हस्के परिवार समाजकारणात-राजकारणात वजन असलेला परिवार.केशवराव बाहेकर याचे सासरे परशराम पाटील जनपद चे त्याकाळातील सदस्य. जवाई राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीचा तर सासरे सत्यशोधक समाजाचे पुरस्कर्ते.( स्व केशवराव बाहेकर यांच्या जीवनावरील जीवन संग्राम या पुस्तकात त्यांच्या सासऱ्याचे नाव चुकीचे व अर्धवट माहितीवरील टाकल्या गेलेले आहे. ) स्व.कलाबाई बाहेकर, अंत्री येथील स्व जयवंताबाई खेडेकर,मेरा येथील स्व यमुनाबाई पडघान, शारा ता. लोणार येथील स्व गयाबाई डव्हळे, मादनी येथील स्व. शेवंताबाई बाजड आणि बेलगाव ता मेहकर येथील गोदाबाई वानखेडे अशा ६ बहिणी आणि त्र्यंबकराव हा मुलगा अशा पद्धतीचा परशराम पाटील म्हस्के यांचा परिवार.

माझे वडील स्व रा ना पवार हे त्याकाळातील ज्येष्ठवक्ते,शिक्षण तज्ज्ञ, आणि राजकीय अभ्यासक आणि विश्लेषक म्हणून प्रसिद्ध होते.अनेकांना आमदार करण्यात आणि अनेक नेत्यांना घडविण्यात त्यांचा मोठा वाटा. स्व. भास्करराव शिंगणे, स्व. जगाराव चव्हाण, स्व. सुमनताई पाटील,स्व. जे के खरात,स्व शिवाजीराव पाटील,स्व. भाऊसाहेब लोढे अशी कैक नावे असतील,की ज्यांच्या राजकीय घडामोडीत त्यांचे योगदान ठळकपणे समाजाला माहिती आहे.

त्यामुळे राजकारण समाजकारणात वावरणारी मंडळी बाबांना कधी टाळत नसायची. शाळेसाठी घरून गेलेले बाबा अंगावरील कपड्यांसह बाहेरगावी गेल्याचा घरी शिपायाकरवी निरोपच यायचा.

स्व. केशवराव बाहेकर यांच्याशी हा झालेला बालपणातील परिचय आणि नंतर त्यांचा झालेला शेवट माझ्या मनात कायमचे घर करून राहिला.

१९५७ मध्ये बुलडाणा लोकसभेची जनसंघाकडून निवडणूक लढवून तशाही परिस्थितीत ३४ टक्क्याच्या वर अर्थात तब्बल ७८६७८ मते घेऊन दुसऱ्या स्थानी ते राहीले होते.तो काळ म्हणजे देशाला नुकतेच स्वातंत्र्य मिळाले होते तर १९४७ ला नथुराम गोडसे या माथेफिरूने महात्मा गांधी यांची हत्या केली होती.त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर सरकारने बंदी आणलेली होती.त्याचवेळी स्व. केशवराव बाहेकर यांनी स्वतःला अटक करवून घेतली होती. गांधी हत्येचा लोकांच्या मनात प्रचंड राग होता. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्त्यांकडे, जनसंघाकडे लोकांचा बघण्याचा दृष्टीकोन वेगळा होता, असे असतांना देखील आणि त्यातल्या त्यात त्यावेळी त्यांच्या विरोधात काँग्रेसचे जे उमेदवार होते,त्यांच्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित



जवाहरलाल नेहरू यांनी अजिंठा येथे प्रचार सभा देखील घेतली होती. त्यासभेला आणि त्यातल्या त्यात पंडित जवाहरलाल नेहरू यांना बघण्यासाठी-ऐकण्यासाठी बुलडाणा भागातून लोकं सायकल ने, बैलगाडीने अजिंठा गेले होते.परिणामी काँग्रेसचे लोकसभा उमेदवार शिवराम राणे यांना 1 लाख 31 हजार 914 मते मिळून ते विजयी झाले होते व दुसऱ्या स्थानावर केशवराव बाहेकर होते.त्यापूर्वी १९५२ मध्ये केशवरावांनी चिखली विधानसभा निवडणूक लढवली होती. १९५२ ची चिखली विधानसभा,१९५७ ची बुलढाणा लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर आता आपण निवडणूक लढवू नये हा विचार मनात पक्का करत असतांनाच १९६७ ची निवडणूक न लढण्याचा त्यांनी निर्णय घेताच, महाराष्ट्र जनसंघाचे राज्याचे अध्यक्ष बच्चूरावजी व्यास हे त्यांच्या कीन्होळा गावी आले. हारजीत साठी नव्हे तर पक्षाचे वाढीसाठी,पक्ष लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी तुम्ही लढले पाहिजे असे त्यांनी केशवराव बाहेकर यांना सांगितले आणि त्यानंतर ते सतत जनसंघ- भाजपा चे उमेदवार म्हणून पराजयाची चिंता न करता लढतच राहीले, मला आठवतं एका निवडणुकीत तर त्यांनी एकाच वेळी बुलडाणा आणि चिखली विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती.१९७२,१९७७,१९८२ च्या विधानसभा निवडणुकीत जनसंघाचा दिवा आणि नंतर भाजपाचे कमळ टवटवीत ठेवण्याचे काम केले.

आणीबाणी मध्ये तुरुंगवास भोगलेल्या, गोवा मुक्ती संग्रामात उडी घेतलेल्या आणि काश्मीर सत्याग्रहात सहभागी झालेले केशवराव बाहेकर मोठ्या उंचीचे नेते होते. जनपथ च्या काळात काही वर्षे शिक्षक आणि नंतर कापड दुकानदार म्हणून व्यवसायात उतरलेल्या केशवरावांनी पक्षासाठी आपले रक्त आटवून देह झिजविला. उत्तम वक्ते, गोरा वर्ण, उत्तम संवाद कौशल्य, असलेले केशवराव गावात मात्र फारसे बोलत नसायचे. मात्र वैचारिक पातळी जिथे जुळते तिथे क्षणभर देखील गप्प राहत नसायचे.

बुलडाणा येथील प्रबोधन विद्यालय असेल, चिखली येथे बँक काढणे असो. गंम्मत म्हणजे केशवराव बाहेकर यांनी अनेकदा विधानसभा व लोकसभा निवडणुका लढविल्या, ते एकदा देखील विजयी होऊ शकले नाहीत मात्र बुलडाणा येथे प्रबोधन विद्यालयात त्यांनी हिंदी हा विषय शिकविण्यासाठी त्या संस्थेवर उज्जैन मध्यप्रदेश येथील हरिभाऊ जोशी नावाचे शिक्षक आणले होते. कालांतराने जोशी यांनी राजीनामा देऊन ते मध्यप्रदेशात परत गेले. तिथे जनसंघाच्या वतीने निवडणूक लढविली, ते विजयी झाले आणि मध्यप्रदेश सरकार मध्ये शिक्षणमंत्री झाले. मात्र त्यांच्यापेक्षा अधिक गुणवत्ता,विदवत्ता असतांना, अभ्यासपूर्ण वक्तृत्व असतांना विजयाची माळ त्यांच्या गळ्यात जरी पडली नसली तरीही त्यांनी जी पायाभरणी केली त्याच बळावर आज भाजपाला आजचे दिवस दिसत आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने शिवस्वराज्य यात्रा काढली होती.त्या यात्रेत अमोल मिटकरी या तरुणाचे भाषणाने प्रभावित होऊन अजितदादा पवार यांनी मिटकरी यांना विधानपरिषदेत पाठवले.एकीकडे हे चित्र असतांना दुसरीकडे मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघ- जनसंघ ते भाजपा असा खडतर प्रवास असलेले,भाजपाला सर्वदूर नेऊन पोहचविणारे,पराभवाची चिंता न करता पक्ष सर्वदूर पोहचावा, जिवंत रहावा म्हणून सतत निवडणुका लढणाऱ्या केशवराव बाहेकर यांना भाजपाला विधानपरिषदेत पाठवता आले नाही,हे दुर्दैवच !

देशभर सर्वांशी परिचय असलेल्या केशवरावांच्या आयुष्यात शेवटपर्यंत संघर्षच आला. भाजपाचा राष्ट्रीय पातळीवरील हा नेता १९८६ ला घर सोडून गेला.शोधाशोध झाली,सापडले नाहीत. त्यांनी ओंकारेश्वर येथे जलसमाधी घेत आपले आयुष्य संपवून टाकले.बुलडाणा केंद्रीय सहकारी बँकेचे पासबुक व इतर वस्तूंवरून त्यांनी तिथेच जलसमाधी घेतली असावी असा अंदाज बांधल्या जातो.

जी माणसं करारी असतात,ध्येयनिष्ठ असतात,ज्यांनी आयुष्यात धोरणात्मक बाबींची पेरणी केलेली असते,अशीच माणसं टोकाचा निर्णय घेत असतात,कारण प्राणापेक्षा देखील त्यांच्या साठी महत्वाचा असतो तो म्हणजे स्वाभिमान !

**न झुकना,न अपने किरदार को झुकने देना अगर लेनी पडी सांसे,स्वाभिमान को बेचकर तो मत लेना...**

# दीपस्तंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**भारताच्या या महान व पवित्र भूमीचा इतिहास अनंत काळापासून जगाचा दीपस्तंभ म्हणून भूमिका निभावत आहे. महात्मा गौतम बुद्ध, महात्मा वर्धमान महाविर, सम्राट चंद्रगुप्त मौर्य, सम्राट अशोक, सम्राट विक्रमादित्य, सम्राट अकबर, छत्रपती शिवाजी महाराज, कबीर, महात्मा फुले इत्यादी महापुरुषांनी आपल्या कार्याने या भूमीचा इतिहास दैदिप्यमान केला आहे, मात्र डॉ बाबासाहेब आंबेडकर या नावाशिवाय हा इतिहास नक्कीच अपूर्ण आहे.**

बाबासाहेब १४ एप्रिल १८९१ या वर्षी दिवशी जन्मास आले. भिमराव रामजी आंबेडकर ते महामानव बाबासाहेब आंबेडकर हा एक अनंताचा खडतर प्रवास आहे. भिमराव रामजी आंबेडकर "उर्फ" महामानव बाबासाहेब आंबेडकर असे म्हणणे कदाचित सर्वसामान्य जनतेसाठी परवलीचे असेल परंतू हा "उर्फ" सकल मानवजातीला एक चिरंतन प्रेरणा देणारा अदभूत प्रवास आहे. सर्वच जन्माला बालक म्हणूनच येतात. भिमराव हे बालक मात्र सामान्य म्हणून जन्माला आले तरी या बालकाचे जीवन सकल मानवजातीला अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या, स्वातंत्र्याच्या, आत्माभिमानाच्या व आत्मसन्मानाच्या प्रकाशाकडे घेऊन जाणारी एक दैदिप्यमान ज्योत नव्हे तर एक चिरंतन मशाल आहे. आज भिमराव हे केवळ एक नाव नसून ती एक संकल्पना आहे. ते एक महाशक्तीमान बळ आहे. भिमराव रामजी आंबेडकर ते बाबासाहेब आंबेडकर हा एक वादळी प्रवास आहे. अवसान गळालेल्या पामरांचा श्वास आहे. दीन दलितांना आपल्या आत्मसंम्मानाकडे घेऊन जाणारी एक शिडी आहे. अज्ञानी व आंधळ्या समाजाची काठी आहे.

भारतीय समाज प्राचीन काळापासून मानवजातीला काळिमा फासणाऱ्या जातीभेदाच्या कलंकाने ग्रासलेला होता. साऱ्या जगाचे लक्ष आपल्याकडे वेधनारी ही सुंदर भूमी जातिभेदाच्या नावाखाली आपल्याच पुत्रांचे काही समाज घटकांकडून होणारे शोषण असहायतेने पाहत होती. मानव म्हणून जगण्याचा अधिकार नाकारून पशुवत वागणूक याच भूमीच्या लेकरांना दिली जात होती. जाती भेदाच्या ह्या भिंती अभेद्य वाटाव्यात अशाच होत्या. या भिंतींना जमीनदोस्त करून जातीभेदाच्या साखळदंडात जायबंदी झालेल्या असहाय दलित जनतेला आत्मसंमानाची पहाट नव्हे तर भर दुपार निर्माण करण्याची लिला करणारा एक महामानव म्हणजे बाबासाहेब. बाबासाहेबांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे वर्षानुवर्षे पददलित व मागास ठेवल्या गेलेल्या व राहिलेल्या समाजासाठी स्वातंत्र्याची व आत्माभिमानाची गुरुकिल्ली असणारा महान ग्रंथच आहे. "शिका, संघटित व्हा व संघर्ष करा" हा मंत्र बाबासाहेबांनी संपुर्ण मानवजातीला दिला. शिक्षणाची व शिकण्याची तृष्णा जितकी बाबासाहेबांना होती तेवढी कदाचित ना कोणाला त्यांच्या आधी होती ना कधी येणाऱ्या भविष्यात कोणाला असेल. बाबासाहेब हे आपल्या संपुर्ण आयुष्यभर एक विद्यार्थी राहिले. त्यांच्या नावापुढे असलेल्या पदव्या त्याची अमीट साक्ष आहे. बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड व कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराजानी केलेल्या मदतीमुळे बाबासाहेबांनी अमेरिका व इंग्लंड या देशांतून उच्च शिक्षण घेतले होते. आपल्याला मिळालेली ही सुवर्णसंधी बाबासाहेबानी थोडीसुद्धा गमावली नाही. अमेरिका व इंग्लंड मधील आपल्या वास्तव्याचा क्षण आणि क्षण त्यांनी आपल्या अभ्यासात गुंतवला. १८ तास अभ्यास केवळ ३ ते ४ तास झोप केवळ एकवेळ जेवण अशी सवय स्वतःला जडवून घेत आपल्याला मिळालेल्या संधीचे त्यांनी सोने केले. आपल्या परदेशी वास्तव्यात रस्त्याने जाताना एक पुस्तक खरेदी करून वाचायला सुरुवात केल्यानंतर बाबासाहेबाना लक्षात आले की त्यांनी ते पुस्तक खरेदी करण्यासाठी दोन दिवसाच्या जेवणाचे पैसे खर्च करून टाकले त्यामुळे बाबासाहेबानी दोन दिवस जेवण न घेता ते पूर्ण पुस्तक वाचुन काढले, कदाचित आज युवक दोन पुस्तकांचे पैसे एका जेवणावर खर्च करून टाकतात, ही खडतर मेहनत केवळ निश्चियी व असमान्य व्यक्तीच करू शकतात. आजच्या तरुणांनी यातून प्रेरणा न घ्यावी म्हणजे याहून दुर्दैव ते कोणते असेल ? वर्षानुवर्षे मानसिक दृष्टया खचलेल्या दलित समाजाची मानसिकता उंचावण्यासाठी बाबासाहेबांनी काळाराम मंदिर सत्याग्रहासारखे सत्याग्रह करूनही प्रचलित हिंदू समाज आपला सनातनी हेका सोडण्यास तयार नाही हे बाबासाहेबांच्या लक्षात आल्यावर दलितांची मान हा प्रचलित हिंदू धर्म ताठ होऊ देणार नाही याची मनोमन खात्री पटल्यानंतर बाबासाहेबांना अतोनात क्लेश झाले व उद्विग्नतेत येवला या ठिकाणी त्यांनी १९३६ मध्ये ऐतिहासिक घोषणा करून धर्म परिवर्तनाचा आपला मनसुबा जाहीर केला व १९५६ मध्ये तो निर्णय खरा करून दाखविला. बाबासाहेबांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली बौद्ध धर्माची निवडही बाबासाहेबांनी खूप विचारांती केली केवळ बौद्ध धर्मच पददलित समाजाच्या पिचलेल्या मानसिकतेचे उत्थान घडवून आणू शकतो हे बाबासाहेबांना ठाऊक होते व त्याचबरोबर आवश्यक असलेली सामाजिक शांतता केवळ बौद्ध धर्मच प्रस्थापित करू शकतो हे सुद्धा बाबासाहेबांना ठाऊक होते. आज भारतीय जीवनाच्या सर्वच क्षेत्रात दलित समुदायाने ताठ मानेने आपले पाय रोवले आहेत. वर्षानुवर्षे एका ग्लानीत व मरगळीत असलेला समुदाय नव चैतन्याने व आपल्या आत्मसम्मानने यशाची शिखरे पादाक्रांत करत आहे. कधीकाळी समाजाच्या जातीव्यवस्थेच्या उतरंडीत अगदी तळाला स्थान असलेल्या समुदायाचा सदस्य, माननीय के आर नारायणन, भारताच्या राजकीय जीवनाच्या सर्वोच्च स्थानावर विराजमान झाला आहे. मायावतींसारख्या धडाडीच्या महिला मुख्यमंत्री पदी निवडल्या गेल्या होत्या. या व अशा अनेक क्षेत्रात आज दलित समुदायाने आपली छाप सोडली आहे. हे सारे जादू झाल्यागत वाटते, परंतु ही जादू घडविणारा किमयागार म्हणजे महामानव बाबासाहेब होत....!!! जीवनाच्या सर्वच क्षेत्रात बाबासाहेबांना गती होती मग ते राजकारण असो, समाजकारण असो, विज्ञान असो वा अर्थकारण असो. बाबासाहेबांच्या विचारांची आवश्यकता जितकी शंभर वर्षांपूर्वी होती, तितकीच, किंबहुना त्याहून जास्त आज आहे. आजही या भारतीय समाजातील मरगळ व ग्लानी पूर्णार्थाने दूर झालेली नाही. आजही आपल्याला बाबासाहेबांचे विचार अंगिकरण्याची आवश्यकता आहे. बाबासाहेब एक ध्येयवेडे व्यक्तिमत्व होते. आंबेडकरांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाले. दुसऱ्या दिवशी ७ डिसेंबर रोजी मुंबईतील चैत्यभूमी येथे त्यांच्यावर अंतिमसंस्कार करण्यात आले. चंदनाप्रमाणे देह झिझवुन या सकळ मानवजातीला अज्ञानाच्या अंधकारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे आणून सोडले आहे. हा प्रवास बाबासाहेबांनी आपल्या विचारांच्या मशालीने आपल्यासाठी सुखकर केला आहे. बाबासाहेबांच्या विचारांची ती मशाल तशीच चिरंतन तेवत ठेवण्याची पवित्र जबाबदारी आपलीच आहे. अन्यायाचा अंधार काल होता. तो बाबासाहेबांनी आपल्या अविरत संघर्षाने न्यायात परिवर्तित केला. अन्यायाचा अंधार आजही आहे, कदाचित तो उद्याही असेल मात्र बाबासाहेबांच्या विचारांची मशाल धडधडत आहे धडधडत राहील प्रत्येक मनात. बाबासाहेबांनी आपण घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग आपल्या समाज बांधवाना दास्यत्वाच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी केला. आपलीही तितकीच जबाबदारी आहे, त्या शिक्षणाचा उपयोग समाजाच्या कल्याणार्थ करण्याची बाबासाहेबांना आपली खरी आदरांजली तीच असेल. महामानव,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन ! जय भीम ..... !!!!

# बालशिक्षणाचा अनुबंध सांगणारा अभ्यासपूर्ण ग्रंथ

एकनाथ आव्हाड
संपर्क क्र.: ९८२१७७७९६८

आधुनिक केसरी

**मुलांच्या निकोप, सुदृढ शारीरिक वाढीसाठी तसेच उत्तम भावनिक, बौद्धिक आणि मानसिक विकासासाठी बालसाहित्य आणि बालशिक्षण ही दोन अतिशय महत्त्वाची अंगे आहेत. ही दोन्ही अंगे वेगवेगळी नसून ती परस्परपूरकच आहेत. या दोन्ही अंगांचा सांगोपांग विचार करून 'बालसाहित्य आणि बालशिक्षणाचा अनुबंध' हा अभ्यासपूर्ण ग्रंथ आपल्या सिद्धहस्त लेखणीतून साकारणारे सुप्रसिद्ध ज्येष्ठ बालसाहित्यकार डॉ. सुरेश सावंत यांनी या ग्रंथाद्वारे बालसाहित्य समीक्षेत मोलाची भर घातली आहे.**

सुरेश सावंत यांचे बालसाहित्य आणि बालशिक्षण हे दोन्ही विषय अतिशय जिव्हाळ्याचे. बालशिक्षण आणि बालसाहित्य या दोन्ही क्षेत्राचा त्यांना प्रदीर्घ अनुभव. त्यामुळेच दोन्ही क्षेत्रांबद्दलचे त्यांचे विचार, त्यांनी सुचवलेले बदल, सांगितलेले उपक्रम हे महत्त्वाचेच आहेत. बालसाहित्यातून हसतखेळत बालशिक्षण झाले पाहिजे. बालसाहित्य आणि बालशिक्षणाचा वेगवेगळा विचार होऊच शकत नाही. हे दोन्ही विषय हातात हात घालून यायला हवेत, हा विचार अधोरेखित करणारा हा ग्रंथ वाचकांना बालसाहित्य व बालशिक्षणाकडे डोळसपणे पाहायला शिकवतो.

'बालसाहित्यः आवश्यकता आणि गुणवत्ता' हा लेख म्हणजे कुंटूर येथे संपन्न झालेल्या मैत्रमिलन बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्षीय भाषण होय. या लेखात उत्तम बालसाहित्य ही समाजाची फार मोठी गरज असते हे पटवून देऊन बालसाहित्याला लाभलेली उज्ज्वल परंपरा ते ओघाने सांगतात. या परंपरेतील महत्त्वाचे लेखक आणि त्यांची महत्त्वाची ग्रंथसंपदा यावर भाष्य करतात. या लेखातून मुलं पुस्तकांपर्यंत येत नसतील तर पुस्तकं मुलांपर्यंत मोठ्यांनी न्यायला हवीत, हा महत्त्वाचा विचार डोकावतो.

बालसाहित्य आणि बालशिक्षण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. बालसाहित्य हा आजही एक उपेक्षित प्रांत आहे. कारण ज्यांच्यासाठी ते लिहिले जाते तो बालकच अनेकदा त्या बालसाहित्याचा केंद्रबिंदू नसतो, ही मोठी शोकांतिका आहे. आजची बालकांची पिढी ही फारच चिकित्सक आणि जिज्ञासू आहे. आजच्या बालकुमारांची बालसाहित्याशी गट्टी जमवायची असेल तर आजचे बालसाहित्य त्यांच्या पसंतीला उतरणारे असले पाहिजे. बालसाहित्याच्या माध्यमातून मनोरंजन करायचे की प्रबोधन? असा प्रश्न अधूनमधून उपस्थित केला जातो.याचे उत्तर या ग्रंथातून आपल्याला मिळते. 'बालसाहित्य आणि बालशिक्षणः एका नाण्याच्या दोन बाजू' हा लेख म्हणजे सूर्योदय सर्वसमावेशक साहित्य मंडळ जळगावआयोजित पहिल्या मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्षीय भाषण होय.

'शिक्षणाच्या नावाने' हा लेख शिक्षण, प्रशिक्षण, शिक्षणविषयक सुविधा या गोष्टींवर अचूक भाष्य करणारा आहे. वि. वि. चिपळूणकर नेहमी म्हणायचे, शाळा सुटल्यावरही ज्याची पावले शाळेत घुटमळतात आणि ज्यांच्या पावलांभोवती चिमुकली पावलं घुटमळत राहतात, तो खरा शिक्षक. बालशिक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अशा शिक्षकांची आवश्यकता आजही आहे, असे मत या लेखाच्या अनुषंगाने सावंतसर मांडतात.

'अवांतर वाचनः एक संस्कार' या लेखातून वाचन माणसाला कसे समृद्ध करत जाते हे त्यांनी अनेक उदाहरणांतून पटवून दिले आहे. या अनुषंगाने वाचनालयांचे महत्त्व, वाचनप्रक्रिया वृद्धिंगत होण्यासाठी विविध उपक्रमांची ओळख त्यांनी सहज करून दिली आहे. 'माझी शाळा : आनंदशाळा' या लेखातून सावंतसरांनी शिक्षणक्षेत्रात कार्यरत असताना विद्यार्थी विकासासाठी राबवलेल्या अभिनव, नावीन्यपूर्ण आणि चैतन्यदायी अशा ८१ उपक्रमांची ओळख करून दिली आहे. यातील सर्वच उपक्रम शाळांनी अनुकरण करावे असेच आहेत. हे उपक्रम बालशिक्षण आणि बालसाहित्याला अधिक बळकटी देणारे आहेत.

'प्रतिभाकळ्यांच्या विकासासाठी' हा लेख मुलांनी केलेल्या सर्जनशील लेखनावर भर देणारा आहे. नामदेव माळी यांनी मुलांना वाचतं आणि लिहितं करण्यासाठी सुचवलेल्या कृती येथे महत्त्वाच्या वाटतात. विद्यार्थ्याला वाचते करणे म्हणजेच लेखन अभिव्यक्तीला खतपाणी घालणे होय, हा विचार वाचकांच्या मनापर्यंत हा लेख सहजपणे पोहचवतो.

'समृद्धीचे निसर्गसमृद्ध शिक्षण' हा लेख म्हणजे केरकर दांपत्याने आपली मुलगी समृद्धीला पारंपरिक शाळेत न घालता अनौपचारिक शिक्षण देण्याचा निर्णय घेऊन तिला तिच्या जीवनशिक्षणातून आणि अनुभवातून घडविण्याचा केलेला प्रयत्नच आपल्यापर्यंत पोहचवतो. आज समृद्धीचा 'निर्झर' हा कवितासंग्रह, अप्रूप वसुंधरेचे हा ललितलेखसंग्रह, 'चित्रांची गोष्ट' हा कथासंग्रह आणि 'निसर्ग संवेदना' हा ललितलेखसंग्रह अशी चार पुस्तके प्रकाशित झाली आहेत. या चारही पुस्तकांचा अभ्यासपूर्ण आणि नेमका आढावा या लेखातून घेतलेला आहे.

'नंदीबैल : सांस्कृतिक संचिताचा साक्षीदार' हा लेखातून पाचवीच्या




पाठ्यपुस्तकात पाठ्यपुस्तक मंडळाने समाविष्ट केलेली सुरेश सावंत यांच्या 'नंदीबैल' या कवितेविषयीच्या वाचकांच्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया आणि या कवितेमागची कहाणीच उलगडत जाते. या ग्रंथांचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आजच्या मुलांनी कोणती पुस्तके वाचावी आणि ती का वाचवी? या अनुषंगाने काही महत्त्वाच्या बालसाहित्याची करून दिलेली अभ्यासपूर्ण ओळख मला महत्त्वाची वाटते.

'तेजःपुंज नायकाची प्रेरणादायी कथा' हा लेख म्हणजेच लेखक रवींद्र जवादे यांच्या 'एक होतात तेजःपुंज' या किशोर कादंबरीसाठी लिहिलेली प्रस्तावना होय.

या ग्रंथात ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे बोराडे सरांचा 'हरवलेली शाळा' आणि 'पोपट उडाला भुर्रर' या बालकथासंग्रहावर लिहिलेले अभ्यासपूर्ण विवेचन आहे. एकनाथ आव्हाड यांच्या 'आनंदाची बाग', 'खळाळता अवखळ झरा आणि इतर कथा' या दोन बालकथासंग्रहावरील तसेच 'मिसाईल मॅन डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम' या चरित्रगोष्टींचे चार भाग असणाऱ्या पुस्तकावरील मार्मिक भाष्य आपल्याला वाचायला मिळते. याशिवाय डॉ. संगीता बर्वे यांची 'पियूची वही', सदानंद पुंडपाळ यांचे' वाचू नाचू आनंदाने', संजीवनी बोकील यांचे 'फुले आणि परीराणी', समाधान शिकेतोड यांचे 'जादुई जंगल', प्रा. नारायण शिंदे यांचे 'रंग एकतेचा आणि काही एकांकिका', डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांचे 'सवंगडी' या पुस्तकांचा सविस्तर परिचय या ग्रंथात वाचायला मिळतो. नामदेव माळी यांनी सृजन प्रकाशनतर्फे विद्यार्थ्यांची चार पुस्तके प्रकाशित केली आहेत. एक मल्हार जाधव या विद्यार्थ्याचे 'मल्हारच्या गोष्टी', दुसरे रतन संकपाळ या विद्यार्थ्याचे 'श्रेयस गोष्टी लिहू लागला', तिसरे श्रावणी पाटील या विद्यार्थीनीचे 'आजीने सांगितलेल्या गोष्टी' आणि चौथे श्रीवर्धन पाटोळे या विद्यार्थ्याचे 'मुलं गेली अवकाशात' हे पुस्तकं. या चारही पुस्तकांचा उत्कट परिचय वाचताना सावंतसरांनी लिहित्या चिमुकल्या हातांचा सन्मानच केला आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

बालसाहित्य आणि बालशिक्षण हे दोन्ही विषय जेव्हा हातात हात घालून येतात, तेव्हा शिक्षणप्रक्रियेतील रुक्षपणा गळून जातो आणि अवघी शिक्षणप्रक्रिया ही आनंददायी, चैतन्यदायी होऊन जाते. यासाठी मात्र या दोन्ही विषयांचा मुळापासून अभ्यास हवा. बालसाहित्य आणि बालशिक्षण हा विषय आजच्या घडीला जेवढा चिंतेचा आहे तितकाच किंबहुना त्याहून अधिक चिंतनाचासुद्धा आहे. या विषयाकडे सखोलपणे पाहिले पाहिजे, तेव्हाच या विषयाचे गांभीर्य लक्षात येईल, हीच दृष्टी विकसित करणारा हा ग्रंथ आहे. या ग्रंथाला चिंतनशीलतेची बैठक लाभली आहे. म्हणूनच हा ग्रंथ प्रत्येक शाळेत, प्रत्येक शिक्षक- पालकाकडे आणि बालसाहित्य अभ्यासकांकडे असावा, असे मला आवर्जून वाटते.

**पुस्तकाचे नाव : 'बालसाहित्य आणि बालशिक्षणाचा अनुबंध'**
**लेखक : डॉ. सुरेश सावंत**
**मुखपृष्ठ : संतोष घोंगडे, प्रकाशकः संगत प्रकाशन, नांदेड, पृष्ठे: १७६, किंमत : २५०/-**

# समतावादी निळ्या वादळाचे जनक !

श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**भारताच्या पावन भूमीवर अनेक महापुरुषांनी जन्म घेतला. ते देशासाठी व समाजासाठी अहोरात्र झटले. त्यांनी सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिष्ठा जोपासली. त्यांचा सेवेचा वारसा आजही देशवासियांसाठी आदर्श, मार्गदर्शक व दिशा दर्शक ठरत आहे. अशा या थोर महापुरुषात विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव सर्वात प्रथम उच्चारावे लागेल. डॉ.बाबासाहेब उर्फ भीमराव रामजी आंबेडकर म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक धार्मिक, पत्रकारिता, कायदे अशा विविध क्षेत्रात आपल्या अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्वाने त्यांनी दीन, दलितांच्या, श्रमिकांच्या विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला.**

गलितगात्र झालेल्या मनामनांतून बहुजन समाजक्रांतीचे स्फुलींग चेतविले. त्यांनी मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृत केले. बाबासाहेब म्हणजे प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती होय. ते नुसते पुस्तकी पंडित नव्हते तर त्यांनी आपल्या आयुष्यात आचार आणि विचार यांची सांगड घातली आणि आपल्या तत्वज्ञानाला कृतीची जोड दिली. त्यांनी मानव मात्रांच्या जीवनातील दुःख, दारिद्रय आणि क्लेश दूर करण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले पूरे ज्ञान माहिती व बळ लावले. रंजल्या गांजल्या जनतेच्या तसेच स्त्रीवर्गाच्या, शेतकरी-मजूर वर्गाच्या आणि पददलितांच्या उद्धारार्थ आपले प्राण पणाला लावून समतेची मंगलवाट दाखवली. मानवतेची दिव्य ज्योत निर्माण करते ती व्यक्ती केवळ वंदनीयच नव्हे तर ती व्यक्ती प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती ठरते. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार तथा भारताच्या राष्ट्रीय ग्रंथ- संविधानाचे ग्रंथकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर होत. त्यांचा जन्म वडील रामजी व माता भीमाबाई यांच्या पोटी दि.१४ एप्रिल १८९१ रोजी झाला. बाल भीमावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून ते दांपत्य दक्ष असत. स्वतःसह भीमरावांना वाचनाची खुप आवड असल्यामुळे घरात ग्रंथसंग्रह हा होताच. वडील रामजी हे मुलांनाही चांगली पुस्तके वाचावयास आणून देत असत. म्हणून बाबासाहेबांच्या आयुष्याच्या अंतिम क्षणापावेतो वाचनाची व अभ्यासपूर्ण चिंतनाची सवय त्यांच्या ठायी आढळते. जगद्गुरू संत तुकारामजी व संतशिरोमणी कबीर हे बाबासाहेबांच्या भावी आयुष्यात अभ्यासाचे विषय झालेले दिसतात.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर सत्याच्या मार्गावर चालणारे खरे मार्गदर्शक होते. भ्रष्टाचार, अनीती, अत्याचार, अन्याय यांना त्यांचा प्रखर विरोध होता. जातीभेदाच्या ते विरोधात होते. जातीभेद म्हणजे समाजाला लागलेली किड ते मानत असत. ही सामाजिक किड नष्ट केल्याशिवाय बहुजन समाज एकसंघ होणार नाही, असे ते समजत. डॉ.बाबासाहेब म्हणजे तळागळातील लोकांना बौद्धिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करून त्यांना मंत्र देणारे एक पथदर्शक होते. शिकल्याशिवाय आपल्यावरील न्याय, अन्याय, आपले हक्क हे आपल्याला कळत नाही, अशा प्रकारे त्यांनी समाजात सामाजिक क्रांतीचे रणशिंगच फुंकले. स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान हक्क मिळावेत यासाठी त्यांनी अनेक चळवळी केल्या. स्त्रियांची गुलामगिरीही त्यांनी दूर केली. इ.स.१९२७ ते १९५६पर्यंतच्या काळात त्यांनी भारतीय स्त्रीचा सामाजिक, कायदेशीर आणि राजकीय दर्जा वाढावा म्हणून सतत प्रयत्न केले. सन १९४२ साली भरलेल्या नागपूर येथील परिषदेत त्यांनी महिलांना सांगितले की, स्वच्छता पाळा. सर्व दुर्गुणांपासून दूर रहा. मुलामुलींना शिक्षण अवश्यच द्या. त्यांना महत्वाकांक्षी बनवा. त्यांचा न्यूनगंड दूर करा, अशा महत्वपूर्ण उपदेशांचे डोळ्यांत झणझणीत अंजन घातले. दलितांना त्यांचे हक्क मिळावे यासाठी त्यांनी त्यांच्या हक्कासाठी लढा दिला. श्रमजीवींसाठीही ते खंबीरपणे उभे राहिले. दलितांना मानाचे जीवन जगता यावे, म्हणून ते आजीवन सातत्याने संघर्ष करीत राहीले. केवळ दलितासाठीच नव्हे, तर शेतकरी, शेतमजूर, मजूर आणि कामगार आदींच्या प्रश्नासंबंधी जोरदार लढा दिला. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी, यासाठी त्यांनी शिक्षणाचे महत्व समाजात विशद केले. "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो माणूस प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही," असे ते समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत. "प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाले की, ते पूर्णपणे सुशिक्षित, माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडावेत. शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे. त्यांचे म्हणणे हाते की, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिकदृष्ट्या सशक्त होतो. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे. शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. समाज हितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत. याचे भान या प्रक्रियेत भाग घेणाऱ्यांनी ध्यानी घ्यावे. पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन इ.स.१९४६ साली करून त्यांनी मुंबइला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलींद महाविद्यालय सुरू केले. राष्ट्रहीत व समाजहीताचे भान ठेवणारेच खरे शिक्षण होय, असे ते मानत. डॉ.बाबासाहेबांच्या आचार विचारांत राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा भरलेली होती. डॉ.आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करताच तत्कालीन राष्ट्रीय नेते मंडळी घाबरली. त्यांना वाटले, डॉ.आंबेडकर आता देश सोडून जाणार की काय? परंतु या महामानवांनी निक्षून सांगितले, "आम्ही या भारत देशाची संतान आहोत. आम्हाला राष्ट्रीयत्वाची जाणीव आहेच. राष्ट्रावर संकट आल्यास प्राण पणाला लावून देशाचे रक्षण केले व पुढेही करूच!" यात डॉ.आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनिष्ठा सामावलेली दिसून येते. अशा या महामानवाचे महान कार्य म्हणजे देशासाठी व बहुजनवर्गाच्या समाजासाठीचे सामाजिक बांधिलकीचे कर्तव्य होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विश्वाला मिळालेली महानतम सर्वोत्तम देणगी होय. अशा या महामानवाचे दि.६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाले. त्यांनी आपल्या कार्याचा ठसा आमच्यासाठी मागे उमटवून ठेवला. नमो बुद्धाय, जय भीम!

# परिवर्तनाची मशाल पेटवणारे महात्मा फुले



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारताला परिवर्तन कारी व लोक कल्याणकारी अनेक संत महापुरुष मिळालेले आहे परंतु भारतीय लोकांनी परिवर्तन व लोक कल्याण समजून न घेता आजही मानसिक गुलामच आहेत. हजारो वर्षापासून शिक्षणापासून व विकासापासून दूर ठेवण्यात आलेल्या समाजाला शिक्षणाच्या माध्यमातून लोक कल्याण करण्याची संधी मिळालेली आहे. परंतु स्वतःला सुशिक्षित समजणारा समाज परिवर्तन व लोककल्याण समजून घ्यायला तयार नाही.**

शिक्षणाचा फायदा फक्त नोकरी किंवा स्वार्थासाठी घेऊन आजही तो मानसिक गुलामच आहे. परंतु शिक्षणाच्या माध्यमातून हा तर्क करून मेंदू जागृत केला तर हजारो वर्षापासून शिक्षण व लोक कल्याण पासून कोणी दूर ठेवले? माणसा माणसात भेद करून जाती निर्माण करून त्याचा फायदा कोणी करून घेतला? जाती-जातीत विघटन झाल्याने, जातीच्या व धर्माच्या नावाने अंधश्रद्धेला खत पाणी घातल्याने, पाखंड व भोंदूगिरीला वाव दिल्याने समाजाचे कसे वाटोळे झाले आणि आजही समाजाला त्यापासून कसे वाचवायचे याचा सर्व लेखाजोखा महापुरुषांच्या लेखणीने आम्हाला मिळालेला आहे. परंतु आम्ही वाचण्यास तयार नाही.आम्हाला अजूनही महापुरुष कळालेले नाहीत. कोणताही महापुरुष समजून घ्यायचा असेल तर त्या अगोदर आम्हाला समाजाची पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक असते. परंतु हजारो वर्षापासून अज्ञान मानसिक गुलाम व थोतांडा मध्ये फससल्याने आजही महापुरुष व परिवर्तन कळाले नाही. महात्मा फुले यांना आजही दुर्लक्षित करण्यात येते. महात्मा फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू करून स्त्रियांना शिक्षण देण्याचे काम केले एवढेच सांगितले जाते. महात्मा फुलेंनी स्त्रियांना शिक्षण देऊन महिलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणल्याने आज महिला मोठ्या पदावर विराजमान होत आहे. परंतु अनेक महिलांना महिलांसाठी शिक्षण सुरू करणाऱ्या महात्मा फुले बद्दल आपुलकी आहे ना जाणीव. परंतु महात्मा फुले समजून घेताना फक्त शिक्षण सुरू केले एवढ्या वरच थांबून जमणार नाही. महात्मा फुले यांचे कार्य हे विषमता म्हणून समता प्रस्थापित करणे, समाजातील भेदभाव नष्ट करणे, अंधश्रद्धा पाखंड भोंदूगिरीला मुळासकट उपटून टाकने, सामाजिक मक्तेदारी दूर करून सामाजिक न्याय प्रस्थापित करणे, शेतकरी कामगार व विद्यार्थ्यांचे हित जोपासणे, तसेच उद्योगभिमुख शिक्षण निर्माण करणे असे बहुआयामी काम महात्मा फुले यांनी केले. हजारो वर्षांपासून चालत आलेल्या कनिष्ठ रुढी जुगारून विधवा पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह, घडवून समाजामध्ये क्रांती निर्माण केली. व समाजामध्ये वारंवार प्रबोधन करून आपल्या कृतीमधून परिवर्तनाची मशाल पेटत ठेवली. याची अनेक उदाहरणे आपल्याला मिळतात.

***माळी कुणबी शेती खपून करीती पट्टीची भरती।***
***मिळेना लंगोटी पुरती।***

माळी कुणबी अर्थात शेती करणारा शेतकरी राब राब राबून मेहनतीने पिकवतो. जगाला जगवतो. परंतु त्याच्या अंगावर आहे सारी लंगोटी मिळत नाही. महात्मा फुलेंनी दीडशे वर्षा अगोदर मांडलेले मत आजही तेवढेच खरे आहे. परंतु आपण महात्मा फुले वाचले नसल्याने आपल्याला त्याची जाणीव नाही. त्याही वेळेस शेतकऱ्यांवर कोण अन्याय करत होते आणि आज कोण करतय? हे जाणून घ्यायचे असेल महात्मा फुलेंना वाचणे आवश्यक आहे. निडर प्रखर, वक्तव्य, लिखाण या माध्यमातून महात्मा फुलेंनी समाजामध्ये परिवर्तनाची ऊर्जा भरण्याचे काम केले आहे.

***लहान चिटूकले पोरं करीती ढोराच्या वळती।***
***जोडे नाही पाय पोळती।***
***मुले भलत्याचीच शिकती।***

गोरगरीब बहुजन समाजातील मुलांना आर्थिक परिस्थितीमुळे बालवयातच काम करावे लागते. पोट भरण्यासाठी वाटेल ते काम करून पोटाची आग क्षमवावी लागते. आज जास्त प्रमाणात ढोरे नसले तरी वेगवेगळ्या पद्धतीची कामे बहुजन समाजाची लहान मुलांना करून उदरनिर्वाह करावा लागतो. आणि लहान वयात काम करून सुद्धा त्यांना पायात घालायला चप्पल किंवा अंगात घालायला नीटसे कपडे भेटत नाहीत. दुसरीकडे उच्चवर्णीय यांची मुले परदेशात शिक्षणासाठी जातात आणि ज्यांना शिक्षणाची गरज आहे ते मात्र आजही वेगवेगळ्या परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित ठेवले जाते. असे का घडते याचे सुद्धा स्पष्टीकरण महात्मा फुले यांनी दिलेले आहे...

***इतर धर्मास निंदीती हो***
***नित्य बोधाची रिती हो***
***शुद्र पोरा खोटा धर्म हळूच शिकवीती।***
***मुले भलत्याचीच शिकती।***

धर्माधर्मांमध्ये वाद निर्माण करून बहुजन समाजातील मुलांना धार्मिक व भावनिक बनवले जाते. ही परिस्थिती पूर्वी होती आणि आजही आहे धर्म धर्म मध्ये द्वेष निर्माण करून बहुजन समाजातील मुलांना



खोटा धर्म सांगून धर्मविषयी सांगुन मुख्य मुद्यावरुन दुर्लक्ष केले जाते. हीच ची प्रक्रिया आजही सुरूच आहे. आणि म्हणून बहुजन समाज हा जागृत झालेला नाही. धर्मामुळे कोणाचा आणि कसा फायदा होतो हेही महात्मा फुलेच सांगतात.

***माळ्या कुणब्या बोध करुन रात्री पोथ्या वाचती***
***आपले महत्व शिकवीती।***
***भलतीच थाप देती शिद्यावर दक्षीणा घेती।***
***मुले भलत्याचीच शिकती।***

माळ्याच्या व कुणब्याच्या मुलांना रात्री त्यांच्या मस्तकामध्ये पोथ्या पुराण टाकून एका धर्माचे व एका वर्गाचे वर्चस्व, श्रेष्ठत्व डोक्यात टाकले जाते. त्यांच्या मनावर वारंवार एकच एकच बिंबवले जाते. आणि एवढेच नाही तर कसे धर्माची एकच वर्णाचे वर्चस्व कायम राहूनही एकाच वर्णनाला दानदक्षिणा देण्यासाठी मानसिक तयारी करून घेतली जाते. धर्म अंधश्रद्धा च्या नावाखाली वेगवेगळ्या प्रकारचे दान दक्षिणा घेतली जाते. सांगण्याचा उद्देश हाच बहुजनांच्या मुलांना वेगवेगळ्या खोट्या नाट्या बाबींमध्ये गुंतवून ठेवून शिक्षणाची जाणीव होऊ दिली जात नाही. खोट्या नाट्या गोष्टी मधून पोथी पुराणाच्या बंधनातून मुक्त होण्याचा संदेशही महात्मा फुले देतात. तो अशा प्रकारे....

**सोड गर्वास।लाग मार्गास।**
**जाळ ह्या खोट्या धर्मास।**

धर्माचा गर्व केले पेक्षा कर्म करण्यावरती तरुणांनी लक्ष द्यायला पाहिजे. महात्मा फुले म्हणतात गर्व सोडून द्या चांगल्या मार्गास लागा. आणि जो काही धर्म चुकीच्या पद्धतीने सांगितल्या जातो तो सोडून द्या कारण धर्मामध्ये गुरफटून राहिल्याने कोणाचेही भले होत नाही. आणि धर्माच्या नावाने ज्यांचे भले होते ते कधीच धर्माचा गर्व वा धर्माच्या साठी शिक्षण सोडत नाहीत वा अंधश्रद्धा पाळुन पोथी पुरानात पडून राहत नाही. मात्र बहुजनांचे मुले धर्माच्या नावाखाली मानसिक गुलाम होतात. शिक्षण, रोजगार याकडे दुर्लक्ष करून धार्मिक व भावनिक होतात. याची जाणीव लोकांना व्हायला पाहिजे म्हणून महात्मा फुले लोकांना सांगतात

**जिकडे तिकडे ब्राम्हणशाही।डोळे उघडून पाही।**
**खेडेगावी कुळकर्णी।आहे लेखणीचा धनी।**
**रेन्युवची दप्तरदारी।ब्राम्हण कितीअधिकारी।**
**चहुकडे भटभाई।कुणब्याची दाद नाही।**

वरील बाबी सादर विचार केला तर आजही परिस्थिती फारशी वेगळे नाही आरक्षणाच्या माध्यमातून ज्या काही मोजक्या जागा बहुजन समाजातील तरुणांना दिल्या जातात परंतु बाकीच्या जागेवर कोण आहे हे नव्याने सांगण्याची गरज नाही आणि म्हणून उच्चवर्णांची पोरे नोकरीमध्ये आणि बहुजन समाजातील मुले दंगलीमध्ये सापडतात. त्यांच्यावरती अनेक प्रकारचे गुन्हे दाखल होतात आणि जेव्हा गुन्हे दाखल होतात तेव्हा बहुजन समाजाने ज्या ठिकाणी दान दिले, ज्या ठिकाणी पैसा खर्च केला, त्या ठिकाणचा पैसा गुन्हे दाखल झाल्याच्या नंतर, किंवा अडचणीत तरुण असल्याच्या नंतर यांना उपयोगी पडत नाही. म्हणून खोट्या धर्माच्या मोहाचं न पडता कर्माच्या मोहात पडून आपले कल्याण करण्यासाठी महात्मा फुलेंचे परिवर्तनकारी कार्य, विचार आजही समाजाला दिशादर्शक ठरतात. महात्मा फुले यांनी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपल्या आयुष्य खर्ची घातले महिलांना सुशिक्षित करण्यासाठी अनेक संकटावर मात केली. महिलांना देऊ नको म्हणून ज्यांनी मारेकरी पाठवले त्या व्यवस्थेला आजही महिला मानतात व त्याच विषमतावादी व्यवस्थेनुसार वागतात. परंतु महिलांना शिक्षण देणाऱ्या महात्मा फुलेंच्या विचाराने अपवाद वगळता अनेक महिला जागृत झाल्या नाहीत. आणि शिक्षण म्हणजे फक्त लिहिता वाचता येणे नव्हे तर शिक्षण म्हणजे समाजातील भेदाभेद अंधश्रद्धा, पाखंड, भोंदूगिरी या सर्व गोष्टींना झुगारून समतावादी विज्ञानवादी, तर्कवादी व्यवस्थेचा स्वीकार करणे होय. शिक्षणाला केवळ नोकरी मिळवण्याचे पैसा कमावण्याचे साधन समजले तर, महात्मा फुलेंनी शिक्षणासाठी जी काही मेहनत घेतली जो काही उच्च वर्णीयांचा त्रास सहन केला त्याला काहीच अर्थ उरणार नाही. म्हणून महात्मा फुले यांची जयंती साजरी करताना महात्मा फुले यांच्या स्त्री शिक्षणाविषयी असलेला उद्देश स्त्रिया पर्यंत पोहोचवण्याचे काम करणे आवश्यक आहे. ज्या स्त्रियांना लिहिता वाचता येते, नोकरी करता येते, यांच्यावरती फक्त महात्मा फुलेंचे उपकार आहेत. आणि उपकार विसरून चालणार नाही. म्हणून महात्मा फुले वाचून समजून घेणे आवश्यक आहे. जेव्हा महात्मा फुले कळतील व समाजातील अंधश्रद्धा, पाखंड, भोंदूगिरी, अज्ञान, विषमता नष्ट होईल, तेव्हाच महात्मा फुले स्त्रियांसाठी केले केलेल्या मेहनतीचे सार्थक होईल.

# सहवास 'नेमाडे' सरांचा...


आधुनिक केसरी

**सहवास कोणताही असो परंतु तो सकारात्मक, निःस्वार्थ आणि योग्य मार्गदर्शन असेल तर आयुष्याची कितीतरी गुपितं सहज उलगडली जातात. अशाच एका की, ज्या साहित्यिकाला मराठी साहित्यातील सर्वोच्च असा ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला ते म्हणजे श्री.भालचंद्र नेमाडे सर. साहित्य क्षेत्रात येणाऱ्या प्रत्येकाला अनमोल मार्गदर्शन करून योग्य वहिवाट दाखवली. एक अष्टपैलू व्यक्तिमत्व, लेखक, कवी, समीक्षक आणि अभ्यासक शालेय जीवन जगत असताना स्वप्नांची उंच भरारी घेऊन पुणे येथील फर्ग्युसन कॉलेज पासून मुंबई विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, औरंगाबाद मराठवाडा विद्यापीठ, इंग्रजीचे अध्यापक करून गोवा विद्यापीठात इंग्रजीचे प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणून नियुक्ती ते लंडनमध्ये स्कूल ऑफ ओरिएंटल अँड आफ्रिकन स्टडीज मध्ये मराठी शिकवण्यासाठी एक वर्ष घालवले.**

इंग्रजी साहित्यात पदवी एवढ्या ज्ञानसागरात पोहत असताना 'कोसला' ही त्यांची 1963 मध्ये लिहीलेल्या पहिल्या काल्पनिक आत्मचरित्रात्मक कादंबरी, त्यानंतर 'बिधर', 'हूल' 'जरीला', ' झूल' ह्या कादंबरींचे लिखाण करून 'मेलडी'1970 आणि 'देखणी' ही 1991 हे त्यांचे काव्यसंग्रह 'हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ' हे त्यांचे गाजलेले पुस्तक एवढ्या साऱ्या लेखन प्रपंचात वावरताना मराठी साहित्य क्षेत्रात एक बलाढ्य व्यक्तिमत्व म्हणून साहित्य क्षेत्रात अधिराज्य गाजवून 1991 ला 'साहित्य अकादमी' 2013 ला 'पद्मश्री' तर मराठी भाषेतील कार्यासाठी की, जो भारताच्या नोबेल पुरस्कारा इतका सर्वोच्च मानला जाणारा मराठी साहित्यातील 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळवणारे चौथे साहित्यिक म्हणजे श्री भालचंद्र नेमाडे सर. पहिले वि. स. खांडेकर, कवी कुसुमाग्रज, विंदा करंदीकर आणि हे चौथे..

माणसानं जगावं पण स्वाभिमानानं आणि कीर्ती रूपानं फुलावं अडचणीत सापडलेल्या आणि मार्गामध्ये अडथळे असणाऱ्या वाटसरुला योग्य वाट दाखवून स्वतःमधील स्वार्थ, अहंभाव बाजूला सारून एखाद्या वस्तूबद्दल, घटनेबद्दल किंवा लिखाणाबद्दल आपल्या ज्ञानाच्या योग्य मार्गदर्शनाने अविचारी मनुष्यालाही वैचारिकता प्राप्त करून त्याला त्या क्षेत्रात समृद्ध करण्याचा मानस हा काही ठराविक लोकांच्याकडेच असतो, अशा माणसांमुळे त्या क्षेत्रातील किंवा जोपासत असलेल्या छंदाला साजेसं असं देखणं रूप येऊन त्या व्यक्तीच्या कामामध्ये उत्स्फूर्तपणा येतो जसं की शेतामध्ये एखादं बियाणं पेरल्यानंतर त्याचं रोपट तयार होतं आणि त्या रोपट्याला योग्य असं खतपाणी दिलं तर ते रोपट ही करपून न जाता सतत टवटवीत होतं, तसंच माणसाच्या आयुष्यातही अशा किती तरी घटनाक्रमांची नोंद होते की त्यास योग्य सल्ला मिळाला तर त्याची वहीवाटही सुरळीत आणि योग्य मार्गाने चालू राहते मग त्या वहिवाटेत कितीही काट्यांचे, खच - खळग्यांचे अडथळे येतात अशा दुरापास्त संकटाला सावरून मार्गाची दिशा बदलून जर त्याला वळण मिळालं तर त्याचं जीवन नक्कीच सुखकर समृद्ध आणि लाभदायक ठरू शकतं.

साहित्य क्षेत्रामध्ये विविध प्रकारचे साहित्यिक असतात पण भालचंद्र नेमाडे सरांसारखं दिलखुलास, मनमोकळेपणानं आपल्या प्रतिभेचा गाभा मार्गदर्शनातून प्रकट करताना खरंच मनापासून आनंद होतो. साहित्य क्षेत्रात जर योग्य असे सत्य वळण असलं की त्या साहित्यकाराच्या लिखाणालाही चांगले वळण आणि भारदार शब्दांची जोड मिळते, मग त्या व्यक्तींचा संबंध स्वतःचा एखादा नातेवाईक असो किंवा परका त्यांची ओळख फक्त वैचारिक मार्गदर्शनाने समृद्ध झालेली पाहावयास मिळते. साहित्य क्षेत्राच्या वाटेवरून प्रवास करताना वेगवेगळे



कटू अनुभव पण सत्य समाजापुढे त्यांनी प्रेरित केले. आपला छंद जोपासताना अशा महान साहित्यिकांच्या सानिध्यात प्रवास करताना त्यांच्या बोलण्यातील आणि प्रत्येक शब्दांच्या चढउतारातील वळणाने त्यांच्यातील प्रगल्भता समजून येते. सतत वाचन, लेखन करून जेव्हा शब्दांची मांडणी कोऱ्या कागदावर उमटवताना एखादा लेख, कथा किंवा कवितांचे स्वरूपदर्शन होते मग हळूहळू कवितांच्या प्रांगणात चालताना शब्द फुलांची माळा गुंफताना कधी लय, यमक आणि वेगवेगळे छंद, मात्रांचा अभ्यास कमी पडतो. आजवर कित्येक लिखाण करणारे आहेत योग्य वाटले की पटकन प्रकाशन शोधून लगेच पुस्तक प्रकाशित होते ; परंतु जेव्हा अशा नेमाडे सरांच्या विचारांची, मार्गदर्शनाची संगत, सोबत मिळाल्यानंतर आपण काय करतो ? आणि आपण काय केले पाहिजे ? या प्रश्नांची उकल नक्कीच समजून येते. स्पर्धेच्या युगात इतरांबरोबर स्पर्धा करण्यापेक्षा स्वतः बरोबरच प्रत्येकाने स्पर्धा करावी. आपल्या लिखाणातील शब्दांची भाषा ही कसदार, श्रीमंत आणि चोखंदळ असेल तर आपल्या लेखनाला समृद्धता प्राप्त होते.

प्रत्येक साहित्यिक हा प्रतिभेच्या विश्वात असतो. त्यांचं वाचनावर एवढं प्रभुत्व असतं की सूक्ष्म वाचनाने त्यांच्यातील कौशल्य लेखनातून दिसून येते. समाजातील श्रमिक, कष्टकरी लोकांचे प्रश्न, समाजप्रबोधन अशा कितीतरी विषयांवर कवितेतून, लेखातून समाजापर्यंत पोहोचवून जागरूकता निर्माण करण्याचे काम करतात. जेव्हा अशा महान साहित्यिकांस एखादा पुरस्कार मिळतो तो त्यांच्या कर्तुत्वाने, मनामध्ये द्वेष भेदभाव न ठेवता एकाग्रता वाचनाने.. कारण मराठी भाषेच्या गौरवास्पद त्यांच्या पुस्तकास पुरस्कार दिला जातो. ही खरोखरंच अभिनंदनीय गोष्ट आहे. आज ज्या महान ज्येष्ठ साहित्यिकांची भेट झाली त्या भालचंद्र नेमाडे सरांचा सहवास आणि मार्गदर्शन मिळणं म्हणजे आयुष्यातील सर्वात मोठं समाधान. दैनंदिन शासकीय नोकरी करीत असतानाही मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करून कवितांच्या परीक्षणाकरिता नेमाडे सरांची चर्चा होऊन त्यांनी लगेच सकारात्मकता दाखवून त्यांच्या दररोजच्या कार्यक्रमांची तसेच लिखाणातून ही काही वेळ देऊन दोन महिन्यांच्या कालावधीनंतर दीडशे कवितांचे परीक्षण करून त्या लिखाणांचा अभ्यास केला आणि जवळजवळ 15 ते 16 मुद्यांची त्यांनी एक लिस्ट काढून आणि त्यामध्ये योग्य कविता कोणती, कशी असावी, कशी नसावी त्या प्रत्येक कवितांच्या ओळीचा गर्भित अर्थ समजावून सांगून एक उत्तम कवी कसा घडला जातो त्याबद्दल अनमोल मार्गदर्शन मिळत गेलं. एवढंच नाही तर स्वतःचा गाजलेला 'देखणी' हा 1991 ला प्रकाशित झालेला काव्यसंग्रह हा सुद्धा एक भेट म्हणून दिला प्रत्येक टिपणीचे सविस्तर विश्लेषण करत असताना वेळेचे भानही नव्हते. अभिमान या एकाच गोष्टीचा वाटतो की माझं करियर क्षेत्र हे पोलीस असूनही त्यांना खूप अभिमान वाटला. अशा महान ज्येष्ठ साहित्यिकांचा निःस्वार्थपणाने त्यांचा सहवास मिळत गेला तर लिखाणातही सहज बदल होत जाईल आणि भारदस्तपणा येऊन आपण जोपासत असलेल्या छंदलाही चांगला वाव मिळत जाऊन आठवणीतील साहित्यिक हे नक्कीच मनामध्ये एक विश्वासाचं एक नातं तयार होऊन आयुष्यातील एक नवीन समाधानाची संजीवनी मिळेल.

**– दिलीप नामदेव धायगुडे**
**मो.बा.७७३८०३९१९५**

# राष्ट्रवादी, तृणमूल काँग्रेस, सीपीआयचा राष्ट्रीय दर्जा रद्द; 'आप'ला बढती !!

आधुनिक केसरी

महाराष्ट्राच्या राजकारणातील एक खूप मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राष्ट्रीय दर्जा रद्द करण्यात आला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने याबाबतचा निर्णय घेतला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबतच तृणमूल काँग्रेस आणि सीपीआय या तीनही पक्षांचा राष्ट्रीय दर्जा निवडणूक आयोगाने रद्द केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना 1998 साली झाली होती. तेव्हापासून सलग 15 वर्ष हा पक्ष राज्यात सत्तेत होता. तसेच या पक्षाने देशाच्या राजकारणातही ठसा उमटवला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे एकेकाळी देशाचे केंद्रीय कृषीमंत्रीदेखील होते. असं असताना निवडणूक आयोगाने आज राष्ट्रवादीचा राष्ट्रीय पक्षाचा दर्जा रद्द केल्याची माहिती समोर आली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने याबाबत घेतलेल्या निर्णयाचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला आगामी काळातील राजकारण आणि निवडणुकीत फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही चार राज्यांच्या निवडणुकीमध्ये कमीत कमी ६ टक्के मते असतील किंवा लोकसभेच्या निवडणुकीत तिन किंवा जास्त राज्यामध्ये किमान दोन टक्के मते असतील तर राष्ट्रीय पक्षाचा दर्जा दिला जातो राष्ट्रीय दर्जा मिळाल्यानंतर संपूर्ण देशभरामध्ये एकच चिन्ह मिळते, नवी दिल्लीत पक्षाच्या कार्यालयाला जागा मिळते तसेच निवडणुक काळात दूरदर्शन अथवा इतर सार्वजनिक चॅनेलवर ब्रॉडकास्टिंगसाठी वेळ मिळतो मात्र राष्ट्रीय दर्जा गेल्यानंतर या सर्वाला मुखावे लागते हा राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यासाठी सर्वात मोठा धक्का मानला जातोय. त्यामुळे आगामी काळात केंद्रीय निवडणूक आयोगाच्या या निर्णयावर राष्ट्रवादी पक्ष काय भूमिका मांडतो ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे

**! राजू जाधव,**
**मांगूर जि.बेळगांव**

# बुकीबहाद्दरांचा सिक्सर, पोलीस बोल्ड करणार का ?

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएल - २०२३ चा सोळावा सेशन ३१ मार्चपासून सुरु झाले असून हे सिझन तब्ब्ल ३० मेपर्यंत चालणार आहे. या सिझन प्रत्येक संघ चौदा सामने खेळणार आहे. दोन कॉटर फायनल, एक एलिमीनेटर व फायनल मॅच असे एकूण ७४ सामने खेळले जाणार आहेत. खरं तर क्रिकेट हा खेळ देशाची शान - प्रतिष्ठा, खेळाडूंचे कष्ट, या मॅचमधील रोमांच यामुळे हा खेळ भारतात सर्वात लोकप्रिय खेळ आहे. मात्र अलीकडील काळात आयपीएलने हा खेळ मैदानावर कमी बुकीवरच जास्त खेळला जातो. हे मॅच बघणारे ही याकडे खेळ म्हणून कमी, आपण ज्यावर सट्टा लावला आहे. तो संघ, तो प्लेयर कसा खेळतो याकडेच डोळ्यात प्राण आणून बघितले जाते. धर्माबाद शहरातील क्लबवाले आपला मोर्चा आता क्रिकेटकडे वळवला असून मॅच कोणाचीही असो, सिझन कोणतेही असो यांचा बेटिंग मात्र जोमात चालू असते. बरं काही जाणकारांच असं म्हणणं आहे की, धर्माबाद नगर परिषदेचा वार्षिक अंदाजपत्रक जितका नसेल तितकी उलढाल एका आयपीएल सिझन मध्ये हे सटाबहाद्दार करतात. नायगाव मतदार संघाचे आमदार राजेश पवार व त्यांच्या समर्थकानी या विरोधात मागील सिझनमध्ये आवाज उठवीला होता. त्यामुळे काही प्रमाणात यावर निर्बंध आले होते. मात्र अजून येरे माझ्या मागल्या म्हणत हा बाजार जोरात सुरु आहे.



आयपीएल म्हणजे धर्माबाद शहरातील सट्टाचालकांसाठी दिवाळी असून लोकांचे मात्र दिवाळे निघत आहे .पोलीस प्रशासनाने याकडे फक्त बघण्याची भूमिका न घेता यावर नियंत्रण ठेवावे .
**गणेश गिरी, शिवसेना (ठाकरे) उपजिल्हा प्रमुख**

**सट्टा खेळायचं मग ॲप्प वापरा :** वर्तमानयुग हे तंत्रज्ञानाचे युग असून यात सट्टाबाजार तर कसे मागे राहील . मग काय सट्टाबहाद्दरांनीही काही ॲप, सॉफ्टवेअर, लिंक क्रीयट केले असून आयपीलवर सट्टा खेळायचा असेल तर सोशल मीडियाच्या माध्यमातुन संबंधितापर्यंत हे ॲप, लिंक पोहोचविण्यात आली आहे .सट्टा खेळायचं मग ॲप्प वापरा असा जणू त्यांचा सल्लाच आहे .

**कॅशलेस व्यवहार :** फोन पे, गुगल पे, पे टीएम या सारख्या साधनांच्या माध्यमातून पैशांचा व्यवहार केला जात आहे .सट्टा खेळणाऱ्यांना सट्टा किंगचा खाते क्रमांक पुरविण्यात आला असून लोक त्यांच्या खात्यावर आगाऊ रक्कम जमा करित असतात .ही रक्कम जवळपास दोन लाख रुपये असते .लोक तो पर्यंतच सट्टा खेळू शकतात .जो पर्यंत त्याच्या खात्यावर ( बुक्कीच्या ) पैसे आहेत .

**पैसे नाहीत मग व्याजन घ्या :** आयपील हा केवळ खेळ राहिला नसून तरुणासाठी तो जीवघेणा खेळ होत आहे . कारण नवतरुण मुलं जे छोटा – मोठा व्यवसाय करून आपली उपजीविका भागवितात .किंवा अपार कष्ट घेऊन शेतीतून पीक घेतात . मजुरी करतात, शिक्षण घेतात हे सर्व युवक आयपीएलच्या मायाजालात गुरफटलेले अडकले आहेत .काही जन तर आपले शेती विकून, बटाईने देऊन, आईचे, पत्नीचे दागिने गहाण ठेऊन, फायनान्स घेऊन सट्टा खेळण्यासाठी पैशाची तजवीज करून ठेवतात .मात्र हा पैसा संपाला की, काही लोक अव्वाच्या सव्वा व्याज घेऊन त्याना पैसा दिला जातो . या पैशाला दिवसाला किंवा तासावर व्याज आकरले जाते .यामुळे अनेक तरुण पिढीचे भविष्य धोक्यात आले आहे

बरं हे सर्व घडत असताना पोलिसांना याची खबर नसेल का ?खरं म्हणजे असे मानले जाते की, 'कानून के हात लंबे होते है' या उक्तीप्रमाणे त्यांच्या पर्यंत हे हात पोहचणार का ? हे बघावे लागेल .



**सट्टा कसे खेळतात ? :** कोणत्या बॉलवर बॅट्समन चौकार मारेल की षटकार ? बॉलर विकेट घेईल की नाही ? एक ओव्हरमध्ये तो किती रन देईल . हे फलंदाजला – गोलंदाजला कळते की नाही माहित नाही पण सट्टा खेळणारे व खेळविणारे मात्र यावर भरघोस बेटिंग लावतात .या शिवाय कोणता बॅट्समन किती धावा काढेल ? कोणता गोलंदाज किती विकेट घेईल ? यावर सट्टेबाज सट्टा लावत असतात . उदा .जर एका संघाची किंमत सट्टेबाजारात ४ .८० रुपये असेल आणि सट्टा खेळणाऱ्यांनी एक हजार रुपयांचा सट्टा लावला असेल आणि जर ती टीम जिंकली तर त्याला ४ हजार ८०० रुपये मिळणार .असंच खेळाडूचे, ओव्हरचे, बॉलचे दर ही निश्चित केले जातात .



# अंनिसचे यश, कौमार्य चाचणीवर आधारित चित्रपट

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** जातपंचायत मूठमाती अभियान तसेच अंनिसच्या मार्गदर्शनाखाली कौमार्य चाचणीवर आधारित चित्रपट येत असून त्याचा नाशिकमध्ये प्रीमियर शो येत असल्याची माहिती अंनिसचे राज्य कार्यवाह कृष्णाजी चांदगुडे यांनी दिली.

एका समाजात लग्नाच्या रात्री नवऱ्या मुलीची कौमार्य चाचणी घेतली जाते. त्यात ती पास झाली तरच ते लग्न ग्राह्य धरण्यात येते. प्राचीन काळापासून महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागात ही कुप्रथा आजही सुरू आहे. महाराष्ट्रात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने नाशिकहून या विषयाला वाचा फोडली. संयुक्त राष्ट्र संघातही यावर चर्चा झाली. अखेर अंनिसच्या प्रयत्नातुन महाराष्ट्र शासनाने ही कुप्रथा बंद करण्यासाठी परीपत्रक काढले आहे. मागील वर्षी नाशिकच्या त्र्यंबकरोड येथील एका रिसॉर्टमध्ये परदेशात शिकलेल्या डॉक्टर वर व वधूची कौमार्य परीक्षा अंनिसने थांबवली होती. कौमार्य चाचणी वर आंदोलनाची अंनिसने महाराष्ट्रभर व्याप्ती वाढवली होती. हा विषय जास्तच चर्चिला गेल्याने या सिनेमाचे दिग्दर्शक सुगंध फिल्मसचे चिन्मय पुरोहित यांनी अंनिसच्या मार्गदर्शनाखाली 'एक कोरी प्रेम कथा' हा हिंदी चित्रपट निर्मिती केला आहे. इंग्लंड व भारताच्या विविध भागात चित्रीत झालेल्या या चित्रपटाचा टिझर नुकताच प्रदर्शित झाला असुन तो चाळीस लाख लोकांनी बघितला असल्याने या सिनेमाची मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहे. एक नववधू कौमार्य परीक्षेच्या विरोधात जाऊन कशी लढाई लढते, हे या चित्रपटात दाखवले आहे. जातपंचायतीच्या कौमार्य परीक्षेविरोधात लढणारे अंनिस कार्यकर्त्यांनी नुकतीच मुंबई येथील युनिफी स्टुडिओला भेट देऊन कौमार्य परीक्षेबद्दल दिग्दर्शकाशी चर्चा केल्याची माहिती जातपंचायत मुठमाती अभियानाचे कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी दिली.

या सिनेमात मुख्य नायिका खनक बुद्धीराजा तर नायक अक्षय ओबेराय आहेत. सहनायक राजबब्बर तर सहनायिका पुनम धिल्लो आहे. सुगंध फिल्मसच्या या सिनेमाचे दिग्दर्शक चिन्मय पुरोहित आहे. या सिनेमाचा प्रिमियर शो नाशिक येथे होणार असल्याची माहिती दिग्दर्शकांनी दिली. कार्यकर्त्यांच्या या भेटीत कृष्णा चांदगुडे, ॲड रंजना गवांदे, प्रा.डॉ.सुदेश घोडेराव, ॲड समीर शिंदे, कोमल वर्दे, कृष्णा इंद्रीकर, अरुणा इंद्रीकर, विवेक तमाईचेकर, ऐश्वर्या तमाईचेकर, प्रथमेश वर्दे, अमर जाधव आदी उपस्थित होते.

# डॉ. चेतन जाधव यांची जापान येथील विद्यापीठात निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील डॉ. चेतन जाधव यांची जापान या देशांमध्ये नागोया विद्यापिठात संशोधक म्हणून निवड झाल्यामुळे सर्वत्र स्वागत होत आहे. डॉक्टर जाधव यांनी अत्यंत जिद्दीने कठीण परिश्रमाने रसायनशास्त्र या विषयात बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून डॉक्टरेट पदवी विशेष श्रेणीत पदवी प्राप्त केली तसेच राष्ट्रीय स्तरावरील नेट परीक्षेत सुद्धा उज्वल यश संपादन केले.सध्या ते आय.आय.टी कानपुर येथे पोस्ट डॉक्टरल फेलो म्हणून कार्यरत आहेत..

पुढील उच्च शिक्षणासाठी त्यांची आता जापान या देशांमध्ये नागोया विद्यापीठात पुढील संशोधनासाठी निवड झाली आहे यासाठी त्यांना आय.आय.टी कानपुर येथील मार्गदर्शक प्रा.मा.डी.एच.देठे व प्रा.सि.एच.गिल मागदर्शन लाभले डॉ.चेतन हे जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक,शिक्षण महर्षी स्व. कृष्णराव जाधव आणि माजी उपनगराध्यक्ष ताराबाई जाधव यांचे ते चिरंजीव आहेत तसेच सागर जाधव व उदय जाधव यांचे ते धाकटे बंधू आहेत.



# महात्मा फुले यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**माळीवाडा :** महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत कार्यालय माळीवाडा येथे अभिवादन करण्यात आले यावेळी उपसरपंच कडू भाऊ कीर्तीकर व कृष्णा भाऊ मुळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले यावेळी ग्रामपंचायत सदस्य प्रवीण भाऊ बर्डे मनेश भाऊ गाजरे धम्मपाल भाऊ गायकवाड ग्रामपंचायत सदस्या ज्योतीताई मुळे पोलीस पाटील प्रमोद साठे, अंगणवाडी पर्यवेक्षिका काथार मॅडम शालेय समिती अध्यक्ष नंदकिशोर मुळे ग्रामस्थ सोमनाथ भगत नामदेव धनायत संतोष बर्डे रावसाहेब गाजरे कारभारी फटांगडे अंगणवाडी ताई आशाताई आदी व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

# वैद्यकीय अधिकारी, नर्सेस व कर्मचारी जेंव्हा हातात झाडू घेतात

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभाग मार्फत दि. ७ ते१४ एप्रिल या काळात"सुंदर माझा दवाखाना" या उपक्रम अंतर्गत राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयात रुग्णालयांची अंतर्गत व बाह्य स्वछता करण्यात येत आहे, याचाच भाग म्हणून येथील उपजिल्हा रुग्णालयात सोमवार (ता.१०)रोजी स्वच्छतादूत धोंडीरामसिंह राजपूत यांच्या उपस्थितीत वैद्यकीय अधीक्षक डॉ. गजानन टारपे,वैद्यकीय अधिकारी डॉ आशिष पाटणी, डॉ. सुधाकर मुंढे, डॉ. निलेश अंधळकर व मुख्य परिचारिका रुख्मिनी गवई, व आय.सी.टी.सी. विभागचे विजय पाटील,शशिकांत पाटील यांनी सहकारी सह ट्रामाकेअर सेंटर,व उपजिल्हा रुग्णालय परिसर स्वच्छ केला. रोज रुग्णांना तपासणारे हात, इंजेक्शन देणारे हात यांनी प्रत्यक्ष खराटा हातात घेऊन स्वच्छता केली. सदरील रुग्णालयात दररोज वेगवेगळ्या विभागात व परिसरात स्वच्छता सुरू असून १४ एप्रिलपर्यंत स्वच्छता सुरू राहणार आहे. यात विजया जंगम शर्मिला पाडवी, प्रतिभा मुंढे, निवेदिता सिरते, उर्मिला जाधव, विजय पाटील, किसन चौधरी, शशिकांत पाटील, श्याम उचित, भास्कर दुधारे, संजय शिराळे, रामेशवर नारळे, रामेश्वर सोनवणे, डॉ. मुंढे, डॉ. पाटणी, विजय पाटील, रुख्मिणी गवयी व स्वच्छता दूत सेवानिवृत्त गटशिक्षण अधिकारी धोंडीराम राजपूत व इतर आरोग्य कर्मचारी सहभागी झालेले होते.





# मोलखेडा येथे भागवत कथा व अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहाची सांगता

## श्रीमद् भागवत कथेचे २ तप पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथे संताच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी श्रीमत भागवत कथा प्रारंभ दिनांक ३०/०३/२०२३ वार गुरुवारपासून श्रीमद् भागवत प्रवक्ते ह.भ.प.सदानंद महाराज धामणगाव बढे यांच्या अमृततुल्यवाणीतून भागवत कथा सकाळी ९ ते १२ आणि दुपारी २ ते ५ पर्यंत भाविकाना श्रवणाचा लाभ मिळत असे त्याचप्रमाणे सायकाळी श्री आजाबराव महाराज हरिपाठ,रात्री ठीक ८:३० मि. श्रीहरी कीर्तन,सकाळी काकडा आरती असे रोज नित्यनेमाप्रमाणे कार्यक्रम होऊन कथेमध्ये श्रीकृष्ण जन्म, रुक्मिणी स्वयंवर,गोवर्धन पूजा असे वेगवेगळ्या कार्यक्रम गावकऱ्यांनी आयोजित केले होते. त्याचप्रमाणे आज गुरुवार रोजी काल्याचे किर्तन होऊन सप्ताहची सांगता झाल्यानंतर या नेमा प्रमाणे गावामध्ये तुरळक ठिकाणी पावसाने सुद्धा हजरी लावली. तसेच दुपारी १ ते ४ वाजे पर्यंत महाप्रसादाचे आयोजन केले होते. संध्याकाळी गावातून दिंडी सोहळा नगरप्रदक्षिणा मध्ये गावातील तरुण मित्र मंडळाने पावल्याचा आनंद घेऊन प्रत्येक घराजवळ श्रीमद् भागवत ग्रंथाची पूजा करण्यात आली गावामध्ये कोणत्याही प्रकारचा राजकारणाचा हेतू न ठेवता राजकारण बाजूला ठेवून सर्व गावकऱ्यानी मिळून एका ठिकाणी येऊन या कार्यक्रमाचा आनंद लुटला गावातील सर्व भजनी मंडळी महिला मंडळ गावकरी मंडळी गायनाचार्य मृदंगाचार्य चोपदार भालदार विणेकरी मार्गदर्शक समस्त गावकरी मंडळी मोलखेडा नगर प्रदक्षिणा झाल्यानंतर रात्री ठीक ८:३० मी.ह.भ. प.श्री संदीपजी महाराज ऋषीगड यांचे काल्याचे किर्तन झाले. कार्यक्रमाप्रसंगी पंचकोशीतील सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला या महाप्रसादाचे सौजन्य विनोद पाटील,सौ.रजंना पाटील यांच्या वतीने करण्यात आले होते. याप्रसंगी सरपंचपती ज्ञानेश्वर वारंगणे,हभप आजाबराव महाराज माघारी, हभप मानसिंग महाराज पवार, हभप वासुदेव महाराज मापारी,हभप राजू महाराज काळे,हभप लक्ष्मण महाराज मख, हभप गोपाळ महाराज शिंदे,हभप रामभाऊ जनार्दन पाटील अनंता गायकवाड, अतुल इंगळे,गणेश शिनगारे, वैभव गायकवाड, बालगोपाल, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्णफाटा गावाला दूषित पाणी पुरवठा; ग्रामस्थांचे हाल

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील कर्णफाटा हे छोटेसे असून हे ग्रामपंचायत वाकडीमधे येत असून या गावाला आतापर्यंत पिण्याच्या पाण्याची टाकी शुद्धा नाही साधारण दोनशे घराची वसती असून वाकडी ग्रामपंचायत जोडले गेले आहे.आणि तिथून पाईप लाईनद्वारे कर्णफाटा येथे असलेल्या अतिशय जिर्ण झालेल्या विहीरीत सोडल्या जाते आणि मगच प्रत्येक ग्रामस्थांनी आपल्या पाण्याच्या मोटारीने पाणी भरून घेतात परंतु ग्रामसेवक व सरपंच या गावाकडे फिरकून शुद्धा पाहत नाही येथील ग्रामस्थांना अतिशय दूषित पाणी प्यावे लागत आहे.

याकडे प्रशासन लक्ष देईल का अशा प्रश्ननं ग्रामस्थांना पडला आहे.सरपंच व ग्रामसेवक यांना वेळोवेळी सांगून हि काहीच फायदा होत नाही शेवटी दूषित पाणी प्यावे लागत आहे.ज्या गावांमध्ये पाण्याची टंचाई आहे.अशा गावांमध्ये टॅकरद्वारे पाणी पुरवठा प्रशासन करत असते अस्वच्छ पाणी जिथून उपलब्ध असेल तेथून भरुन तो टॅकर गावात उभा केला जातो परंतु येथे या कर्णफाटा गावात घाण,कचरा टाकलेले अतिशय पाणी अशुद्ध नाईलाजाने वापरावे व प्यावे लागत आहे.मात्र वाकडी ग्रामपंचायतने कडे जाणूनबुजून झोपेचे सोंग घेत आहेत याकडे प्रशासनाने त्वरीत लक्ष दिले पाहिजे नाहीतर रोगराई पसविण्यास वेळ लागणार नाही आणि प्रशासन जबाबदार राहिल अशी ग्रामस्थांमधून चर्चाला उधाण आले आहे.

सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरु आहेत. विहिरीत पावसाच्या साचलेल्या दूषित पाण्यामुळे अनेक साथीचे रोग पसरत आहे.नकळत दूषित



पाणी प्यायलं जातं. त्यामुळे आजारांना सामोरं जावं लागतं. पण जुलाब, उलटी, टायफॉइड, गॅस्ट्रो, विषाणू, जीवाणूंचे आजार, जीवाणूंचे आजार, जंतूची वाढ यांसारखे आजार होतात. याची बहुतांश जणांना माहिती नसते. त्यामुळेच जलजन्य आजारांचे तोटे काय असतात हे सरपंच व ग्रामसेवक यांनी देखील समजून घेतलं पाहिजेत.आणि लवकरात लवकर या विहिरीचा उपासा करून घाण व कचरा साफ करून नंतरचं विहीर भरण्यात यावी नाहीतरी साथीच्या आजारांची साथ आल्यास याला जबाबदार ग्रामपंचायत, सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक जवाबदार राहील अशा गंभीर इशारा येथील ग्रामस्थांनी दिला आहे.



कन्नड येथे समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त कन्नड येथे त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे शहर अध्यक्ष सुनिल पवार भाजपा सोशल मीडियाचे काकासाहेब तायडे भगवान ठाकरे, रमेश नागरे, अनिल शिरसाठ, प्रकाश शिरसे आदींची उपस्थिती होती .




# हाळदा सोसायटीवर आ. शिंदे समर्थकांचा दणदणीत विजय

आधुनिक केसरी न्यूज

**महेंद्र बोराळे**

**कंधार :** अत्यंत प्रतिष्ठेची समजली जाणाऱ्या हाळदा सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीमध्ये लोहा कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय,कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे,शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शामसुंदर शिंदे, शेकापचे मराठवाडा अध्यक्ष विक्रांत दादा शिंदे, युवा नेते रोहित रावसाहेब पाटील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हाळदा सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीमध्ये आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या समर्थकांचा दणदणीत विजय झाला असून हाळदा सेवा सहकारी सोसायटी



आमदार श्यामसुंदर शिंदे समर्थकांच्या ताब्यात आली आहे, आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या समर्थकांच्या पॅनल मधील १३पैकी १३ जागेवर आमदार शिंदे यांच्या समर्थकांनी निर्विवाद वर्चस्व मिळवले आहे, या निवडणुकीत सेवा सहकारी सोसायटी चेअरमनपदी आमदार श्यामसुंदर शिंदे यांचे पुतणे रोहित रावसाहेब पाटील शिंदे सह नवनिर्वाचित सदस्यपदी चक्रधर बालाजी जळबा, ढोणे आत्माराम दत्ताराम, दयापवाड व्यंकटी नारायण, बुरकुले कमलकिशोर चंद्रराव, यलमीटवाड बळीराम श्रीराम, शिंदे दिगंबर व्यंकटराव, शिंदे शिवाजी किशन, शिंदे चौत्राबाई सुभाष, शिंदे भागवतबाई विक्रम, पवार रावसाहेब राजाराम, कुराडे शिवराज गणपतराव, राठोड धनाजी हरिश्चंद्र, वरील सर्व नवनिर्वाचित सेवा सहकारी सोसायटीच्या सदस्यांचे लोहा कंधार मतदारसंघाचे आमदार श्यामसुंदर शिंदे, शेकापच्या महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई श्यामसुंदर शिंदे यांनी अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या व समस्त गावकरी मंडळी चे आभार व्यक्त करण्यात आले यावेळी हाळदा येथील ग्रामस्थांनी मिरवणूक काढत आनंदोत्सव साजरा करण्यात आला यावेळी सर्व गावकरी मंडळी उपस्थित होते.





# जयश्री मारुती लोहार प्रदीर्घ सेवेतून निवृत्त

आधुनिक केसरी न्यूज

**सातारा :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित श्री भवानी विद्यामंदिर सातारा या संस्कार केंद्राच्या ग्रंथपाल सौ. जयश्री मारुती लोहार या त्यांच्या प्रदिर्घ सेवेतून निवृत्त होत आहेत. त्यांचा सेवा गौरव समारंभनिमित्त उभयतांच्या सत्कार सोहळा शनिवार दि. 8 एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता श्री भवानी विद्यामंदिर सातारा येथे आयोजित केला होता. यावेळेस अध्यक्षस्थानी प्राचार्य राजेंद्र शेजवळ सहसचिव प्रशासन ( स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर ) तसेच ज्योतिष शास्त्र रतनलाल शहा हेही उपस्थित होते प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्राचार्य महेश गायकवाड सर ( व्यवस्थापक मंडळ सदस्य ) तसेच हनुमंतराव चव्हाण ( संपादक साप्ताहिक लोह संस्कार व अध्यक्ष सकल लोहार समाज विकास मंच, सातारा आणि अर्चना देशमुख माजी जिल्हा परिषद सदस्य इत्यादी उपस्थित होते तसेच आर. एम. कांबळे ( मुख्याध्यापक भवानी नाईट हायस्कूल सातारा ), प्राचार्य सी. ए.कदम ( प्राचार्या. सुशीलादेवी साळुंखे गर्ल्स हायस्कूल व जुनिअर कॉलेज सातारा ) तसेच व्ही. टी. पार्टे ( मुख्याध्यापीका नूतन मराठी प्राथमिक शाळा ) माजी मुख्याध्यापक नलवडे सर उपस्थित होते. तसेच श्री भवानी विद्यामंदिर साताराचे मुख्याध्यापक एस. बी. पाटील सर ही उपस्थित होते. बर्गे सर यांनी अतिशय प्रभावीपणे सूत्रसंचालनाचे काम पार पाडले तर प्रास्ताविक गायकवाड जी. एन. सरांनी अतिशय प्रभावीपणे मांडले. लोहार मॅडम बद्दल अतिशय प्रभावीपणे माहिती त्यांनी सांगितली तसेच प्राचार्य डॉ महेश गायकवाड सर व गौरी गायकवाड यांनी सेवा गौरव समारंभ निमित्त लोहार मॅडम व सरांचा सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. हनुमंतराव चव्हाण यांनी आपल्या सुंदर वक्तृत्वाने सर्वांची मने जिंकून घेतली व आपल्या वाणीतून मोलाचे विचार मांडले. प्राध्यापक डॉक्टर सुहास पवार, आर, एम. जाधव यांनीही मॅडमनी केलेल्या कार्याचे कौतुक करून दोघांनाही सेवा निवृत्तीनंतरच्या आयुष्यात शुभेच्छा दिल्या तसेच प्रमुख पाहुण्या अर्चना देशमुख यांनीही त्यांच्या कार्याबद्दल कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच त्यांच्या दोन मुली मिलिंदा पवार वडूज व प्रियांका ढम पुणे यांनीही आपल्या आईबद्दल खूप सुंदर मनोगत व्यक्त केले तसेच लोहार मॅडम यांच्या सहकारी व मैत्रीण असलेल्या कुंभार मॅडम यांनी त्यांच्या खुमासदार शैलीत मनोगत व्यक्त केले. तसेच जयश्री लोहार यांनी त्याचे मनोगत व्यक्त केले व सर्व उपस्थितांचे आभार मानले. समारोपाची धुरा गायकवाड मॅडम यांच्याकडे होती त्यांनी ती अतिशय प्रभावीपणे सांभाळली.

# मार्केट कमिटीच्या निवडणुकीत सभापती आपलाच द्या, हीच खरी वाढदिवसाची भेट : आ. मेघना बोर्डीकर

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** सबका साथ सबका विकास हेच ध्येय सोबत घेऊन मी माझी राजकीय वाटचाल सुरू केलेली असून बोर्डीकर कुटूंबाने सुद्धा हेच तत्व आजपावेतो पाळलेले आहे. अशी स्पष्टोक्ती आमदार मेघना बोर्डीकरांनी राधाकृष्ण मंगल कार्यालयात त्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात कार्यक्रमात बोलताना दिली. त्यांनी सत्कार सोहळ्यास उत्तर देताना असेही सांगितले की गेल्या अडीच वर्षे आपले सरकार नसतांना सुद्धा जिंतूर-सेलू मतदारसंघा साठी विकास निधी खेचून आणण्यास कमी पडले नाही. आता आपले सरकार आलेले आहे. तेंव्हा 7 ते 8 महिन्यात मतदारसंघातील जवळपास 80 टक्के कामे प्रगतीपथावर असून संपूर्ण मतदारसंघात आगामी एक वर्षात शहरासह ग्रामीण भागात दर्जेदार रस्त्यांची कामे, शाश्वत पाणी, शेतकऱ्यांना मुबलक सिंचनासाठी पाणी व वीजपुरवठा सुरळीत देण्याचा मानस असल्याचे सांगून ज्या-ज्या वेळी बोर्डीकर कुटूंबाच्या हातात सत्ता असते त्या-त्या वेळी सर्वसामान्य व गरजू कुटूंबास सक्षमपणे उभे करण्याचे काम केलेले आहे. येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत विशेषतः मार्केट कमेटीच्या निवडणुकीत सभापती फक्त आपलाच निवडून आला पाहिजे हीच कार्यकर्त्यांकडून मला वाढ दिवसांची भेट अपेक्षित असल्याची साद आ.मेघना बोर्डीकरांनी उपस्थित कार्यकर्त्यांना घातली.



भाजप तालुका अध्यक्ष लक्ष्मणराव बुधवंत यांनी आमदाराच्या कारकिर्दीच्या लेखाजोखा मांडत असे सांगितले की राज्यात आपली सत्ता नसतांना सुद्धा दीदींनी मतदारसंघाच्या विकासासाठी विधानसभेत अभ्यासपूर्ण मागणी करत वेळोवेळी विकासनिधी खेचून आणत सर्वोपरी विकास साधला असून 550 कोटी रु केंद्रा कडून तर राज्यशासना तर्फे 525 कोटी रु विकासनिधी आणला .येलदरी येथील आवश्यक पुला साठी 95 कोटी तर विदर्भ–मराठवाडा जवळचा मार्ग साधण्यासाठी वझर येथील पूर्णा नदीवरील पुला साठी 15 कोटी रु निधी मंजूर करून घेतला सोसायट्या व औद्योगिक वसाहती निवडणुकीत सत्ता एकहाती आपल्या कडे आलेली असून 32 पैकी 24 ग्रामपंचायती माजी आ . रामप्रसाद बोर्डीकर व आमदार मेघना बोर्डीकर,गंगाधर बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या ताब्यात असल्याची माहिती लक्ष्मणराव बुधवंत यांनी दिली .

यावेळी मुकुंद सावजी कमळमकर, गंगाधर बोर्डीकर, ब्रिजगोपाल तोष्णीवाल,वसंत शिंदे, डॉ .संजय रोडगे, संदीप महाराज राजेंद्र थिटे, धर्मचंद अच्छा यांनीही दिदीस शुभेच्छा देत आपले मनोगत व्यक्त केले . मंचावर माजी नगराध्यक्ष सचिन गोरे, रविराज डासाळकर, हमीदखान पठाण, मुना पारवे, राजेश चव्हाण, आत्माराम पवार, गजानन घुगे, सुधाकर कुकडे, किशोर जाधव, दत्ता कटारे, सुनील घुगे, संदीप घुगे, कैलास खंदारे, संदीप लकडे, डॉ . दुर्गादास कान्हडकर, डॉ .देवराव कर्हाळे, सुनील भोंबे, कृष्णा मोरे, रवी घुगे, प्रदीप चौधरी, गणेश कुर्हे, गोपाळ रोकडे, अमोल देशमुख, अँड .सुनील, मते, गोपाल दायमा, संतोष देशमुख, यासीन भाई, इंद्रजित घाटूळ, प्रमोद चव्हाण, डॉ . पंडित दराडे, राजाभाऊ नगरकर, हाकीम भाई, युवराज घनसावध, रमेश गुजर, आकाश चर्हाटे, सचिन रायपत्रीवार, सौ . सुमन बार्शीकर, सौ . संगीता जाधव, सौ . निर्मला बांडे, सौ . राऊतताई, सौ . देशपांडे आदीसह सरपंच, माजी नगरसेवक, ग्रामपंचात सदस्य, पक्ष पदाधिकारी व कार्यक्रत्ये मोठ्या प्रमाणावर या अभिष्टचिंतन सोहळ्यास उपस्थित होते .

# सय्यद दानिश यांचा पहिला रोजा

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** मुस्लिम समाजातील सर्वात पवित्र रमजान हा महिना असून जिंतूर येथील कादरीपलाट येथील सय्यद दानिश सय्यद रियाज वय आठ वर्ष या मुलाने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला. सध्या या वर्षीचा उन्हाळा हा अत्यंत उष्णतेचा सर्वात जास्त तापमान असलेला महिन्यात हा रमजानचा महिना आला आणि मुस्लिम समाजात पवित्र असणाऱ्या या महिन्यात संपूर्ण महिनाभर दिवसभर पाणी न पिता उपवास ठेवला जातो या उष्णतेचा मोठ्या माणसांनादेखील खूप त्रास होतो त्यात या आठ वर्षांची चिमुकल्याने पहिला रोजा ठेवून आपल्या इस्लाम धर्मातील परंपरा नुसार आयुष्याची सुरुवात केली व आपल्या अल्हा समोर पुण्याई चांगल्या प्रकारे व्हावी हीच ईश्वरचरणी प्रार्थना

अशा उष्णतेच्या एवढ्या अवस्थेमध्ये आठ वर्षाच्या वयात सय्यद दानिश सय्यद रियाज या चिमुकल्याने आपल्या आयुष्यातला पहिला रोजा पूर्ण केल्याबद्दल नातेवाईक कडून अभिनंदन होत आहे आजोबा सय्यद हाशमअली,आजी शमिमबेगम,वडिल सय्यद रियाज अली काका सय्यद इलियास, सय्यद फैयाज, सय्यद अय्याज, सय्यद इम्तियाज, सय्यद मुशीर, अकलाख काजी, मुजम्मिल खान सिराज सिद्दीकी आदिंसह मित्र परिवारांनी शुभेच्छा दिल्या.



# प्रा. बाळासाहेब बोराडे यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व दैनिक मराठवाडा साथी'च्या वतीने देण्यात येणारा पत्रमहर्षी स्व.मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा छत्रपती संभाजी नगर येथील हॉटेल वर्षा इनमध्ये नुकताच पार पडला. राज्याचे सहकारमंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अतुल सावे यांच्या हस्ते आधुनिक केसरीचे जिल्हा प्रतिनिधी प्रा. बाळासाहेब बोराडे यांना सहपरिवार हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्मृतिचिन्ह,सन्मानपत्र व प्रेरणादायी पुस्तके देऊन प्राध्यापक बोराडे यांना गौरविण्यात आले. यावेळी मंचावर राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी, संपादक जगदीश बियाणी, मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तथा संपादक डॉ.प्रभू गोरे, व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रा. बाळासाहेब बोराडे यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, पर्यावरण, आरोग्य, कृषी,साहित्य या विषयावर स्तंभलेखन करून आपल्या लेखणीच्या माध्यमातून अनेक विषय हाताळले आहेत.त्याबद्दल त्यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल प्रा. बाळासाहेब बोराडे यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# बहीण-भावाची पोलीस खात्यात निवड


## दोन वर्षाचा असताना वडिलांचा मृत्यू; आईने स्वीकारली जबाबदारी

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर :** आपण पाहतो की सध्याच्या घडीला सरकारी नोकरी लागणे किती अवघड गोष्ट होऊन बसली आहे.परंतु भोकरदन तालुक्यातील व राजूर पासून जवळ असलेल्या चांदई एक्को गावातील अगदी सामान्य कुटुंबातील बहीण-भावानी जिद्द आणि चिकाटीच्या बळावर पुणे जिल्ह्यात पोलीस खात्यात निवड झाली आहे. त्यामुळे सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे.कुठलीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना त्यांनी हे यश संपादन केले आहे. निर्मला तेजराव गवळी व ज्ञानेश्वर तेजराव गवळी असे पोलीस खात्यात निवड झालेल्या बहिण-भावाची नावे आहेत.

निर्मला व ज्ञानेश्वर यांनी गावालगतच्या शाळेतून प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. कोणाचे मार्गदर्शन नसताना व वडिलांचे छत्रछाया हरवलेले असताना कुटुंबाची सर्व जबाबदारी आईने स्वीकारली आणि मुलांना पुढील शिक्षणासाठी बाहेर गावी पाठवले.तेव्हाच या दोघा बहिण-भावाने पोलीस दलात जाऊन आपल्या आईवडिलांच्या कष्टाचं चीज करायचे असा निश्चय केला होता.शेवटी त्यांच्या कठोर परिश्रमाला आज यश मिळाले असून निर्मला गवळी आणि ज्ञानेश्वर गवळी या दोघा बहीण-भावानी पोलीस दलात भरती होऊन आपल्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण केले आहे. यावेळी ज्ञानेश्वर गवळी यांनी सांगितले की माझे वडील शेतात विहिरीवर काम करत असताना त्यांच्या डोक्याला क्रेनच्या फावड्याचा मार लागून मृत्यू झाला होता. तेव्हा मी दोन वर्षांचा होतो तर माझी बहिण निर्मला ही चार महिन्याची होती. वडील गेल्या नंतर कुटुंबाची सर्व जबाबदारी आईवर येऊन पडली होती. कसेबसे प्राथमिक शिक्षण गावातच पूर्ण केले. पुढील शिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर येथील देवगिरी महाविद्यालयात प्रवेश घेतला. रहाण्याची व जेवणाची सोय व्हावी म्हणून समाज कल्याणच्या वसतिगृहात राहू लागलो.शिक्षण घेत असल्यापासूनच पोलीस भरतीचा ध्यास लागला होता असे ज्ञानेश्वरने यांनी सांगितले. कुटुंबात शिक्षणाचा अभाव आणि आर्थिक परिस्थिती बिकट असताना देखील आईने कष्ट करून दोन्ही मुलांचे शिक्षण पूर्ण केले.आज त्या दोघांचीही पुणे शहरात पोलीस दलात निवड झाली आहे. निर्मला आणि ज्ञानेश्वर यांनी या परीक्षेत प्रथम रँक प्राप्त करून विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होऊन हे यश संपादन केले आहे. भविष्यात स्पर्धा परीक्षा देऊन त्यांना पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकारी बनण्याचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले आहे. एकाच कुटुंबातील दोघे बहिण भाऊ पोलीस दलात भरती झाल्याने ही गोष्ट परिसरातील इतर युवकांना प्रोत्साहन व प्रेरणा देणारी ठरत आहे.माणसांच्या अंगी जिद्द आणि चिकाटी असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही हे निर्मला आणि ज्ञानेश्वरने सिद्ध करून दाखवले आहे.त्यामुळे सर्व स्तरातून या दोघा बहीण-भावांचे कौतुक होत आहे.



# काँग्रेस आजही जेपीसीवर ठाम : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अदानी समुहात एलआयसी, स्टेट बँक ऑफ इंडिया, पीएफचा पैसा बेकायदेशीरपणे गुतंवलेला आहे. हा कोट्यवधी जनतेच्या कष्टाचा पैसा आहे, त्याचा हिशोब जनतेला मिळालाच पाहिजे. अदानी कंपन्यांतील घोटाळ्याचे सत्य बाहेर आणायचे असेल तर संयुक्त संसदिय समितीच्या चौकशीतूनच सर्व सत्य बाहेर येऊ शकते. म्हणूनच काँग्रेससह देशातील १९ पक्षांनी जेपीसीची मागणी केली आहे आणि काँग्रेस आजही या मागणीवर ठाम आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी स्पष्ट केले. यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, संयुक्त संसदीय समितीची मागणी पहिल्यांदाच होत नाही, याआधीही जेपीसी स्थापन करुन चौकशी करण्यात आली आहे. तथाकथित बोफोर्स प्रकरणी जेपीसी स्थापन करण्यात आली होती. शेअर बाजारातील घोटाळ्याच्या तपासासाठी जेपीसी स्थापन केली होती तसेच शितपेयासंदर्भातील प्रकरणातही जेपीसीमार्फतच चौकशी झाली होती, विशेष म्हणजे २००३ साली शितपेयांसंदर्भात स्थापन केलेल्या जेपीसीचे अध्यक्ष शरद पवार होते, त्यावेळीही कोर्टाची समिती होती तरिही जेपीसी स्थापन केलीच होती. अदानी प्रकरणात काही गौडबंगाल नाही तर मग जेपीसीला मोदी का घाबरत आहेत ? असा सवालही नाना पटोले यांनी विचारला आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या शिक्षणाचा मुद्दा नाही तर त्यांनी निवडणुक आयोगाला दिलेल्या प्रतिज्ञापत्रात पदवीचा उल्लेख केला आहे. त्यांनी पदवी घेतली असेल तर मग त्यांनी पदवी दाखवावी, निवडणुक आयोगाला खोटी माहिती देणे गुन्हा आहे, एवढाच प्रश्न आहे. पत्रकाराने विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, बाजार समित्यांच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने कोणत्या पक्षाशी युती करावी हा त्यांचा निर्णय आहे. भारतीय जनता पक्षाच्या हुकूमशाही कारभारविरोधात आम्ही महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढत आहोत . राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नागालँडमध्ये भाजपाला पाठिंबा दिलेला आहे. राष्ट्रवादीच्या या मुद्द्यावर बैठकीत चर्चा करु. काँग्रेस पक्षातून जर कोणी स्थानिक पातळीवर भाजपाशी हातमिळवणी केली तर त्यांच्यावर मात्र पक्ष कारवाई करेल.

# महात्मा फुलेंनी मानवतेचा संदेश दिला

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांनी जगतात स्त्री व पुरुष या दोनच जाती मानून संपूर्ण विश्वाला स्त्री-पुरुष समानता हे तत्व प्रदान करून मानवता संदेश दिला,असे उदगार समाज कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यानी मंगळवार रोजी शहरातील सायकलिस्ट व स्वीमिंग ग्रुप च्या वतीने महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्याला सकाळी सहा वाजता पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना केले,वैजापूर सायकलिस्ट व स्वीमिंग ग्रुप च्या वतीने पोलीस निरीक्षक संजय लोहकरे,नगरसेवक स्वप्नील जेजुरकर, धनंजय अभंग,कुमोद जेजुरकर, बाबासाहेब जगताप,जयराम खाडे व राजपूत यांनी महात्मा फुले यांना अभिवादन केल्या नंतर हा ग्रुप सायकलीगसाठी रवाना झाला, सेवानिवृत्त गटशिक्षण अधिकारी धोंडीराम राजपूत पुढे म्हणाले की,यापुढे जगात खूप पैसे व मालमत्ता असणारा व्यक्ती श्रीमंत असणार नाही तर ज्याच्याकडे आरोग्य आहे. चारित्र्य आहे तो सर्वात मोठा श्रीमंत असणार आहे, यासाठी सायकलिस्ट व स्वीमिंग ग्रुप चे ध्येय वाक्य सायकल चालवा-आयुष्य वाढवा स्वीमिंग करा-निरोगी रहा, आरोग्य हीच संपत्ती -गाडी,बंगला आपत्ती हे ध्यानी मनी ठेऊन आरोग्य जपा असेही शेवटी राजपूत म्हणाले, या प्रसंगी स्वच्छता निरीक्षक प्रमोद निकाळे, रमेश त्रिभुवन, प्रतीक देवरे, भास्कर खरात, यशवंत घोत्रे, बाबासाहेब निमसे, मधुकर तांबे, जयराम खाडे, संतोष डमाळे,बाबा वारकर व ग्रुप उपस्थित होता. शेवटी जगताप यांनी आभार मानले व ग्रुप रवाना झाला.

# युवा संसदसाठी स्नेहल बर्डे, अमोल पवारची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** मॉडेल कॉलेज घनसावंगी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक कु. स्नेहलबर्डे , अमोल पवार यांची राष्ट्रीय सेवा योजना उच्च व तंत्र शिक्षण विभाग युनिसेफ महाराष्ट्र व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय युवा संसद कार्यक्रमासाठी निवड करण्यात आलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ च्या वतीने घेण्यात आलेल्या निवड चाचणी मध्ये गुनानुक्रमे या दोघांची निवड करण्यात आलेली आहे. येणाऱ्या 18 आणि 19 एप्रिल रोजी मुंबई येथे होणाऱ्या "राज्य युवा संसद" होणार आहे.




या यशस्वीतेबद्दल कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, प्र. कलगुरू डॉ. श्याम शिरसाठ, डॉ. प्राचार्य डॉ. सतीश दांडगे, कार्यक्रमाधिकारी बाळासाहेब वरखडे डॉ. संतोष गायकवाड, डॉ.कन्नूलाल विटोरे,डॉ भीमराव पुंडगे, डॉ बालासाहेब सोनवणे, डॉ. ज्ञानेश्वर खोजे ,प्रा खंडू नवखंदे,डॉ प्रा उदय पवार, प्रा. भागवत गोरे यांनी यांचे अभिनंदन केले आहे.

# 'वडार समाज दशा व दिशा' पुस्तकास कदम यांच्या हस्ते पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** राजरत्न उत्कृष्ट वाङ्‌मय पुरस्कार लेखक ॲड. पंडित गायकवाड यांच्या वडार समाज दशा व दिशा या पुस्तकास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांच्या हस्ते देण्यात आला. रमाई धम्म सृष्टी स्मारक समितीच्या वतीने दिल्या जाणाऱ्या राजरत्न राजरत्न उत्कृष्ट वाङ्‌मय पुरस्कार राजरत्न उत्कृष्ट वाङ्‌मय पुरस्कार लेखक ॲड. पंडित गायकवाड यांच्या वडार समाज दशा व दिशा या पुस्तकास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी बोलताना समाजातील नवीन लेखकांनी दुर्लक्षित लहान लहान जातींच्या पूर्वपरंपरेच्या ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक तपशीलासह संदर्भासह व प्रचिलित असलेल्या रुढी, परंपरा व विधिविषयी विस्ताराने ग्रंथ स्वरूपात लिखाण व्यक्त केले. यावेळी रमाई धम्म सृष्टी स्मारक समिती अध्यक्ष प्रसिद्ध साहित्यिक प्रा. देवानंद पवार, साहित्यिक डॉ. सुरेश चौथाईवाले, ॲड. बाबा सरदार, ॲड. उत्तम केदारे, नौशाद बेग आदी उपस्थित होते.




गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर